रायगड, सोमवार दि. १२ जून २०२३

कृषीवल

किंमत ४

कुस्तीपटूंच्या आंदोलनाची दखल

पान ८ वर

कर्जत : सुरेश टोकरें यांचे राजकीय भवितव्य उज्वल

पान ३ वर

आजचा अग्रलेख

भाकऱ्या फिरल्या

वेधक

ब्रिजभूषण यांचे आव्हान

नवी दिल्ली : कुस्तीगीर महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंग यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप आहेत. महिला कुस्तीपटूंनी त्यांच्यावरील कारवाईच्या मागणीसाठी दिल्लीत आंदोलन केलं. मात्र अद्याप ब्रिजभूषण यांच्यावर कारवाई झालेली नाही. त्यातच आपली कैसरगंज मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे.

अखेर तो आला... आनंदसरी कोसळल्या!

। अलिबाग । प्रतिनिधी ।

वैशाख वणव्याने तप्त झालेल्या धरतीला रविवारी (११ जून) ओलेचिंब करीत मृगाच्या पावसाचे रायगडसह संपूर्ण कोकणात जोरदार आगमन झाले. नेहमी जूनच्या पहिल्या आठवड्यात येणारा मोसमी पाऊस यावेळी मात्र चार दिवस अंमल तसा उशिराच आला. अरबी समुद्रात निर्माण झालेल्या बिपरजॉय चक्रीवादळाच्या परिणामाने मोसमी पावसाची वाट अडली गेली. पण अचानकपणे देवभूमीत शनिवारी दाखल झालेल्या पावसाने लगेचच जोरदार वाटचाल करीत अवघा कोकणही पादाक्रांत केला.

रविवारी सकाळीच पुणे मध्यवर्ती वेधशाळेनेही रत्नागिरी, सिंधुदुर्गाच्या किनारी मोसमी पाऊस दाखल झाल्याचे शुभ वर्तमान दिले होते. पाठोपाठ तो सायंकाळी रायगडातही ठिकठिकाणी बरसू लागला आणि तप्त झालेल्या धरतीला ओलेचिंब करुन टाकले. संध्याकाळी उन, पावसाचा खेळ अनुभवता आला. कडक उन्हातही पावसाच्या जोरदार सरी कोसळत राहिल्या.या पहिल्याच पावसात भिजण्याचा आनंद आबालवृद्धांनी घेत वरुणराजाचे जोरदार स्वागतही केले. पावसाच्या आगमनाने आता बळीराजाही सुखावला आहे. येत्या काही दिवसात पुन्हा पावसाचा जोर वाढेल,असा अंदाजही व्यक्त केला जात आहे.

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर मोसमी पाऊस अखेर रविवारी (११ जून) दुपारी राज्यात दाखल झाला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार रत्नागिरीत मोसमी पाऊस दाखल झाला असून, हलक्या आनंद सरीही सुरू झाल्या होत्या.

साखर येथे वडाची फांदी पडली

। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील आक्षी-साखर रस्त्यावरील वडाच्या झाडाची मोठी फांदी विजेच्या पोलवर पडून महावितरणचे नुकसान झाले. त्यामुळे साखर गावची वीजसेवा खंडित झालेली आहे. रविवारी (दि.११) दुपारी २ वा.च्या सुमारास ही घटना घडली. रस्त्यावरील वडाच्या झाडाची मोठी फांदी विजेच्या खांबावर पडून विजसेवा खंडित झालेली आहे. तुटलेली फांदी उचलून रस्ता पूर्ववत होईपर्यंत ३ ते ४ तास आक्षी साखर वाहतूक ठप्प झाली होती. वडाची फांदी थेट पोलवर पडल्यामुळे पोल वाकला गेला आहे. सोमवारी वाकलेला विजेचा पोल बदलण्यात येणार आहे. खंडित झालेली विजसेवा तात्पुरत्या स्वरूपात रात्री ९ वाजेपर्यंत चालू होईल असे महावितरणकडून सांगण्यात आले आहे.



ऑनलाईन धर्मांतर प्रकरणी

अलिबागेत धडक कारवाई

। भारत रांजणकर ।

। अलिबाग ।

ऑनलाईन धर्मांतर प्रकरणी शाहनवाज मकसुद खान याला अलिबागमधून अटक करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. मुंब्रा पोलिसांनी ही कारवाई केली आहे. या कारवाईने रायगड पुन्हा चर्चेत आला आहे.

मुंब्रा पोलिसांकडून अटक

हिंदू धर्मीय मुलांना ऑनलाइन गेमद्वारे धर्मांतर होत असल्याची नोटीस उत्तर प्रदेशातील गाझियाबाद पोलिसांनी बजावली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी शाहनवाज खान हा आपल्या कुटुंबियांसोबत मुंब्रा येथील देवरीपाडा परिसरात रहात असल्याची माहिती गाजियाबाद पोलिसांना मिळाली. या मिळालेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेश एसटीएफचे पथक आरोपीच्या शोधासाठी मुंब्र्यात दाखल झाले होते. मात्र तो कुटुंबीयांसह तेथून फरार असल्याचे स्पष्ट झाले.



या प्रकरणाच्या तपासात उत्तरप्रदेश •➤ पान २ वर

पाकिस्तान कनेक्शन ?

मोबाईल गेमद्वारे धर्मांतर प्रकरणाचे कनेक्शन पाकिस्तानशी जुळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ठाणे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपी शाहनवाज मकसूदकडून चौकशीत मोठी माहिती समोर आली आहे. फरार झाकीर नाईक यांच्या भाषणाला प्रेरित होऊन धर्मांतराचे कृत्य केल्याची माहिती दिली आहे. मुळचा मुंबईचा झाकीर नाईक भाषणाद्वारे धर्मांतर आणि प्रतिबंधित देशातून फंड घेतल्याप्रकरणी फरार आहे. झाकीर नाईक आखाती देशात तसेच पाकिस्तानात असल्याची माहिती मधल्या काळात एजन्सीने दिली होती. अटक आरोपी मकसूदने गाझीयाबाद येथील मुलाचे धर्मांतर झाकीर नाईक यांच्या भाषणाआधारे केल्याची कबूली दिली आहे. आरोपी मकसूदकडून १ मोबाईल फोन, १ टॅब जप्त करण्यात आला आहे. शाहनवाज मकसूद हा काही प्रतिबंधित आरोपींशी संपर्कात असल्याचा ठाणे पोलिसांना संशय आहे. गाझीयाबाद पोलीस आरोपी शाहनवाज मकसूद याला शोधत होती. अलिबाग मधून त्याला अटक करण्यात आली आहे. एका लॉजमध्ये नाव बदलून राहत होता.

पोलिसांचे 'जागते रहो'

रायगड : मंदिरातील चोरी टाळण्यासाठी उपाययोजना

। प्रमोद जाधव ।

। अलिबाग ।

रायगड जिल्ह्यामध्ये विशेष करून चौल येथील दत्त मंदिर चोरी, थेरोंडा येथील खंडोबा चोरी अशा अनेक मंदिर चोरी प्रकरणानंतर रायगड पोलीस सतर्क झाले आहेत. मंदिरातील सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी जिल्ह्यातील मंदिरांच्या सुरक्षेचा आढावा घेतला जाणार आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी त्यानुसार पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत.

रायगड जिल्हा औद्योगिकीरणाबरोबरच पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा ठरत असताना जिल्ह्यामध्ये अनेक धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. वेगवेगळी प्राचीन मंदिरे •➤ पान २ वर

निर्जनस्थळांवर नजर

चिंचोटी येथील तरुणीच्या जीवघेण्या हल्ल्यानंतर रायगड पोलिसांनी महिला सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. जिल्ह्यातील निर्जनस्थळांची पाहणी करण्याच्या सूचना पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या होत्या. त्याच्या हालचाली सुरु झाल्या असून अनेक भागांची पाहणी पोलिसांमार्फत सुरु करण्यात आली आहे असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली. त्यामुळे लवकरच निर्जन स्थळांवर पोलीसांची नजर राहणार आहे.

रायगड जिल्ह्यात सुमारे दोन हजार पेक्षा अधिक गावे असून ग्रामीण भागाची लोकसंख्या सुमारे १६ लाख पेक्षा •➤ पान २ वर

> मंदिर चोरी प्रकरणानंतर जिल्ह्यातील मंदिराची सुरक्षा अधिक मजबूत रहावी यासाठी मंदिरांच्या सुरक्षेचा आढावा घेतला जाणार आहे. त्याचे ऑडिटही केले जाणार आहे. ज्या सुरक्षा पाहिजे त्या नुसार उपाययोजना करून सुरक्षा चांगल्या पध्दतीने राखण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.
> - सोमनाथ घार्गे - पोलीस अधीक्षक, रायगड

'दादांची जबाबदारी मुख्यमंत्र्यांसारखीच'

। मुंबई । प्रतिनिधी ।

अजितदादा हे राज्याचे विरोधी पक्षनेते आहेत.आणि ते पद हे मुख्यमंत्र्यांच्या बरोबरीचे असते,अस प्रतिपादन राष्ट्रवादीच्या कार्यकारी अध्यक्षपदी सुप्रिया सुळे यांनी केले आहे. दादा नाराज असल्याच्या वृत्ताचाही त्यांनी इन्कार केला. सुळे यांच्यावर घराणेशाहीचा आरोप केला जात आहे. त्या आरोपाला सुळे यांनीही सडेतोड उत्तर देत होय, राष्ट्रवादीत घराणेशाही आहे, असे त्यांनी ठणकावून सांगितले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या २४ व्या वर्धापनदिनी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यावर कार्यकारी अध्यक्षाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. यानंतर सुळे यांच्यावर विरोधकांकडून घराणेशाहीचा आरोप करण्यात येत आहे. याला सुप्रिया सुळे प्रत्युत्तर देत होय मला शरद पवार आणि प्रतिभा पवार यांची मुलगी असल्याचा सार्थ अभिमान आहे, असं म्हटलं. पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. मी प्रफुल्ल पटेल आणि शरद पवार यांना अहवाल देणार आहे. तर, महाराष्ट्रात छगन भुजबळ, अजित पवार आणि जयंत पाटील यांना अहवाल देणार आहे. अशी माहिती •➤ पान २ वर

> आरोप करणाऱ्यांनी जरूर करावे. आरोप करणाऱ्या पक्षातील घराणेशाही संसदेत आकडेवारीसह दाखवली आहे. त्यामुळे एक बोट माझ्याकडे केल्यावर तीन त्यांच्याकडं असतात. देशात माझा पहिला क्रमांक येतो, तेव्हा माझे वडिल संसदेत पास करत नाहीत. मला सातत्याने संसदरत्न मिळते, तेव्हा तुम्हाला घराणेशाही दिसत नाही. सोयीप्रमाणे घराणेशाही दिसते, - सुप्रिया सुळे, खासदार

गडावरून पडून पर्यटकाचा मृत्यू

। माथेरान । वार्ताहर ।

गिर्यारोहणासाठी आलेल्या श्रीराम प्रभाकर मराठे (वय ६४), रा. पुणे यांचा ईरशाळगडावर गिर्यारोहण करतेवेळी पाय घसरून दरीत पडल्यामुळे मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. श्रीराम मराठे हे त्यांच्या तीन मित्रांसह ईर्शाळगडावर गिर्यारोहणासाठी आले होते. पाय घसरल्यामुळे ते २०० ते २५० फूट खोल दरीत पडले. शोधमोहिमेसाठी निसर्ग मित्र मंडळ पनवेल, यशवंती हायकर्स खोपोली आणि शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा यांनी शोध घेत त्यांचा मृतदेह शोधून काढला. असे पोलिसांनी सांगितले.

गेलसाठी चौदा तास वीजपुरवठा खंडित

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल कंपनीमध्ये दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाचे काम गेल्या दहा महिन्यांपासून सुरु आहे. या प्रकल्पाच्या कामांसाठी प्रशासन सर्वसामान्यांना वेठीस धरत असल्याचा प्रकार समोर आला आहे. गेल कंपनीमध्ये वीज खांब लावण्यासाठी शनिवार पहाटे चार वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत अनेक गावांमधील वीज पुरवठा बंद केला होता. चौदा तास वीज पुरवठा बंद असल्याने नागरिकांचे हाल झाले. शिवाय वेगवेगळ्या लहान मोठ्या व्यवसायांवरही परिणाम झाला आहे. महावितरणच्या या कारभाराबाबत नाराजीचे सूर उमटले आहेत.

महावितरण कंपनीमार्फत दर आठवड्याला मंगळवारी देखभाल दुरुस्तीचे काम केले जाते. महावितरण कंपनीने •➤ पान २ वर

विश्वकसोटी : ऑस्ट्रेलिया अजिंक्य

। लंडन । वृत्तसंस्था ।

अवघ्या क्रिकेट विश्वाचे लक्ष लागून राहिलेल्या विश्वकसोटी अजिंक्यपद सामन्यात बलाढ्य ऑस्ट्रेलियापुढे भारताने सपशेल लोटांगण घालत दारुण पराभव पत्करला. तब्बल २०९ धावांनी भारतीय संघाला पराभवाला सामोरे जावे लागले.

ऑस्ट्रेलियाने भारताला विजयासाठी ४४४ धावांचं तगडं आव्हान दिलं होतं. या धावांचा पाठलाग करताना भारताच्या फलंदाजांनी निराशाजनक कामगिरी केली. कर्णधार रोहित शर्मा, शुबमन गिल, विराट कोहली आणि अजिंक्य रहाणेसारख्या फॉर्ममध्ये असलेल्या फलंदाजांना बाद करण्यात ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांना यश आलं.



■ भारताचा दारुण पराभव

शेवटच्या दिवशी स्कॉट बोलँडने एकाच षटकात विराट कोहली आणि रवींद्र जडेजाला बाद केलं आणि ऑस्ट्रेलियाला विजयाच्या दिशेनं नेलं. कांगारु गोलंदाजांच्या भेदक माऱ्यामुळं भारताचा संपूर्ण डाव ६३.३ षटकात २३४ धावांवर आटोपला. भारताला सर्वबाद •➤ पान २ वर

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ जून

१) श्रीम.मालती मधुकर गोखले,
परांजपे वाडा, अलिबाग,
१२ जून १९४०
२) श्री. वामन धर्मा गायकवाड
श्रीबाग -२ अलिबाग
१२ जून १९५२
३) श्री.चंद्रकांत रामदास पाटील
नागडोंगरी,अलिबाग
१२ जून १९५२
४) श्री.चंद्रकांत नाथालाल मेहता
मिरची गल्ली, अलिबाग
१२ जून १९५८

माथेरानची हवाईसेवा अद्यापही 'हवेतच'

। नेरळ। प्रतिनिधी ।

माथेरानमध्ये पर्यावरण पूरक ई रिक्षा सुरु झाल्यानंतर वाहतुकीची आणखी काही साधने उपलब्ध करून दिल्यास आणखी पर्यटक माथेरान मध्ये पर्यटनासाठी येऊ शकतात. त्यासाठी माथेरान मध्ये राज्याच्या अन्य महानगरातून हेलिकॉप्टर सेवा सुरु होण्याची मागणी माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांनी बोलून दाखवली आहे. दरम्यान, माथेरान मध्ये २००१ मध्ये हेलिकॉप्टर सेवा सुरु देखील झाली होती,मात्र पर्यावरण स्नेही संस्थांकडून जोरदार आक्षेप घेण्यात आला आणि हेलिकॉप्टर सेवा बंद पडली. मात्र आता येणारे पर्यटक लक्षात घेता वाहतुकीचे अन्य पर्याय देखील खुले व्हायला हवेत अशी मागणी सावंत यांनी माध्यमांसमोर केली आहे.

२००१ मध्ये माथेरान ते मुंबई अशी हेलिकॉप्टर सेवा सुरु झाली होती. त्यावेळी पर्यावरण प्रेमी यांनी आक्षेप घेतल्याने हेलिकॉप्टर सेवा तात्काळ बंद झाली होती.

त्यावेळी ऑलंपिया रेसकोर्स मैदानावर हेलिकॉप्टर उतरताना उडणारी लाला मातीची धूळ आणि त्यामुळे आजुबाजुंच्या झाडांना होणारे नुकसान लक्षात घेऊन हेलिकॉप्टर सेवा बंद करण्याची मागणी सर्वोच्य न्यायालयात करण्यात आली होती. २००७ मध्ये माथेरान मध्ये हेलिकॉप्टर सेवा सुरु करण्यासाठी राज्य पर्यटन विकास महामंडळ म्हणजे एमटीडीसीकडून जोरदार प्रयत्न झाले होते. राज्य पर्यटन विकास महामंडळ यांनी माथेरानमध्ये माथेरान नगरपालिका आणि माथेरान हॉटेल असोसिएशन यांची संयुक्त बैठक २००७ मध्ये मुंबईत झाली होती.त्यावेळी माथेरान नगरपरिषद कडून शासनाने निर्णय घेतल्यास विमान कंपन्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचा निर्णय जाहीर केला होता. माथेरान- मुंबई अशी हेलिकॉप्टर सेवा सुरू करण्यासाठी पर्यटन विकास महामंडळ उत्सुक होते. त्यासाठी पवनहंस या हेलिकॉप्टर सेवा देणाऱ्या कंपनीने माथेरानमध्ये येऊन येथील ऑलंपिया रेसकोर्स येथे जाऊन पाहणी केली होती. हेलिकॉप्टर सेवेबाबत तातडीने काही सांगणे कठीण असल्याचे मतही व्यक्त केले जात आहे. मात्र,राज्य पर्यटन विकास महामंडळ ही सेवा सुरू करण्यासाठी आशावादी आहे. माथेरान पर्यटनस्थळी मोठ्या संख्येने पर्यटक यावेत यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळ प्रयत्न करीत होते. माथेरानच्या पर्यटन व्यवसायाला सुगीचे दिवस आणू शकेल असा क्रांतिकारक निर्णय राज्य सरकार घेणार असेल तर माथेरान मध्ये जगभरातील पर्यटक यांच्यासोबत देशाच्या विविध भागातील पर्यटक यांना माथेरान जवळचे वाटू लागेल. माथेरानमध्ये हेलिकॉप्टर सेवा सुरू करण्यासाठी राज्य पर्यटन महामंडळ उत्सुक सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका यंत्रणा करू शकतात असा आशावाद व्यक्त केला जात आहे.

हेलिकॉप्टर उतरले होते

राज्यात शिवसेना भाजप युतीचे सरकार असताना माथेरान मधील एका हॉटेलचे उदघाटन करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी हे १९९७ मध्ये हेकोप्तर मधून पोहचले होते.ऑलंपिया रेसकोर्स येथे हेलीकॉप्टर ठेवून मुख्यमंत्री असलेलले मनोहर जोशी हे तेथून पायी चालत नगरपरिषद कार्यालय असे पोलीस स्टेशन च्या बाजूला असलेल्या हॉटेल चे उदघाटन करण्यासाठी पोहचले होते.त्यानंतर काही वर्षांनी मुंबईत - माथेरान अशी हेलिकॉप्टर सेवा सुरु झाली होती.

पनवेल : नवीन इमारतीच्या आरेखनाला पुरस्कार

। पनवेल । वार्ताहर ।

इंटरनॅशनल प्रापर्टी ॲण्ड ट्रॅव्हलच्यावतीने थायलंड येथे नुकतीच आंतरराष्ट्रीय स्तरावरील आरेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मबेस्ट पब्लिक सर्व्हिसेस आर्किटेक्चर इंडियाफ या गटामध्ये हितेन सेठी आर्किटेक्चरच्यावतीने सादर करण्यात आलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या नव्या मुख्यालयाच्या आरेखनाला पाच स्टार मानांकनांबरोबर एशिया पॅसिफिक प्रॉपर्टी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या पुरस्कारामुळे पनवेल महापालिकेच्या नव्या मुख्यालयाच्या इमारतीला एक महत्व प्राप्त झाले आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या दूरदर्शी विचारातून

उभारण्यात येणारी पनवेल महानगरपालिकेची नवी इमारत असा पुरस्कार मिळवणारी महाराष्ट्रातील एकमेव महापालिकेची इमारत आहे.सहा मजली महापालिकेच्या या नव्या मुख्यालयामध्ये २२४ आसन क्षमतेचे एक मुख्य सभागृह, १ बहुद्देशिय हॉल, समिती सभागृह, टेरेसवरती आर्ट गॅलरी असणार आहे. ही इमारत जास्तीत जास्त टिकाऊ बनविण्यावरती हितेन सेठी आर्किटेक्चरच्यावतीने भर देण्यात आला आहे.या पुरस्काराबद्दल आयुक्त गणेश देशमुख यांनी मुख्यालयामध्ये हितेन सेठी यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी उपायुक्त सचिन पवार, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, एचएसए कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या नुतन मुख्यालयाच्या तळमजल्याचे काम पुर्ण झाले असून येत्या काही दिवसांत इमारतीच्या पहिल्या मजल्याचा स्लॅब टाकण्यात येणार आहे. महापालिकेची नव्या इमारत प्रत्यक्षात आणण्यासाठी शहर अभियंता संजय जगताप,कार्यकारी अभियंता संजय कटेकर आणि संपुर्ण तांत्रिक टिम अथक परिश्रम घेत आहे.

राजू शेट्टी सरकारवर बसवले

कोल्हापूर : शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे. गतिमान वेगवान सरकार असल्याच सोंग करतंय. पिकविमा मिळेना , उसाचा अंतिम हप्ता ठरेना , प्रोत्साहनपर अनुदानाच तर मेळच लागेना. म्हणूनच सांगतो शेतक-यांनो कोल्हापूरच्या जनता दरबारात याचा जाब विचारायला यायला लागतय !!, असं ट्विट राजू शेट्टी यांनी केलं आहे. तसेच राज्य सरकारच्या कारभारवर त्यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, अलिबाग
जिल्हा परिषद, रायगड-अलिबाग.
अंगणवाडी मदतनीस पदभरती - २०२३
जाहिरात क्रमांक १/२०२३ दिनांक :- १२/०६/२०२३

महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. PIL-२०१८/प्र.क्र.२२३/का.६ दिनांक -९ जानेवारी २०२३.२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६/दिनांक - ०२ फेब्रुवारी २०२३ ३) मा. आयुक्त रुबल अग्रवाल, आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडिल जा.क्र.एबाविसेयो/अंगणवाडी / का-७/५११/२०२३ दिनांक - ०७/०२/२०२३ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, अलिबाग अंतर्गत अंगणवाडी केंद्रामध्ये अंगणवाडी मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका यांची रिक्त पदे भरावयाची आहेत. त्याकरिता ग्रामीण भागासाठी संबंधित महसुल गावातीलच (ग्रामपंचायत नव्हे) ज्या गावात अंगणवाडी केंद्रे आहेत. तसेच स्थानिक महिला उमेदवाराकडुन जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र महिला उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील फक्त स्थानिक गावातील रहिवासी असलेल्या इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, अलिबाग यांचे कार्यालयात (पंचायत समिती अलिबाग तळ मजला) तालुका - अलिबाग येथे दिनांक - १३/६/२०२३ ते दिनांक - २६/०६/२०२३ पर्यंत (कार्यालयीन सुट्ट्या वगळुन) सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत पोहचतील अश्या बेताने पाठवावेत. त्यानंतर येणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. यांची नोंद घ्यावी.

अंगणवाडी निहाय भरावयाच्या पदाचा तपशिल खालीलप्रमाणे
अंगणवाडी मदतनीस :- १.मापगाव २.गुंजीस ३. नवगाव (अ)४. नवगांव (ब) ५. बामणसुरे ६. वरसोली (अ) ७. बूरूमखाण ८. थळआगर ९. आगरसुरे १०. नांदईपाडा ११. धोकवडे (ब) १२. मांडवेपाडा १३. रांजणपाडा १४.धामणपाडा १५.बांधण १६.देहेन १७.रामवाडी १८. भाकरवड १९. कुरुळ ब २०. कार्ले २१. खंडाळे २२. सागरगड २३. गाणतर्फे श्रीगाण २४. गोंधळपाडा २५. खिडकी २६. आवेटी २७. नागझरी २८. सांबरी २९. बिडवागळे ३०. पिटकरी ३१. बहिरोळे ३२.कामार्ले ३३.चिचंवली ३४. वाघ्रण ३५. म्हात्रोळी ३६. रांजणखार डावली (अ) ३७. नारंगी ३८. देऊळभाट ३९. वरंडे ४०. वावे ४१. सराई ४२. भिलजी ४३. मोरोंडे ४४. कुदे ४५. पाल्हे ४६. नागाव हटाळे ४७. नागांव बंदर ४८.आगरआळी ४९.आक्षी ५०. चौल सागमळा ५१. तुलाडदेवी ५२. सहाणगोठी ५३. थेरोंडा (अ) ५४. जांभुळवाडी

अटी व शर्ती :- १. शैक्षणिक पात्रता :- अंगणवाडी मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका पदासाठी इ. १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहिल.
२. वास्तव्याची (स्थानिक रहिवासी असणे) अट :- अंगणवाडी मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका पदासाठी फक्त त्या गावातील ग्रामपंचायत नव्हे तर महसुली गांव / वाडी /वस्ती/ पाडे यासह क्षेत्रातील रहिवासी असतील त्यांनाच स्थानिक समजण्यात येईल.
३. वयाची अट :- अंगणवाडी मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका पदावर सरळ नियुक्तीसाठी (By Nomination) वयोमर्यादा किमान १८ वर्ष व कमाल ३५ वर्ष अशी राहिल. तथापि, विधवा उमेदवारांसाठी ही वयोमर्यादा कमाल ४० वर्षे अशी राहिल. ४.लहान कुटूंब :-अंगणवाडी मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका पदावरील सरळ सेवेने नियुक्तीसाठी लहान कुंटूबांची अट खालीलप्रमाणे लागु राहिल :-१. लहान कुटूंब याचा अर्थ, उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये, २. उमेदवाराला दोन हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यासह) अधिक अपत्ये असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतुन तात्काळ सेवामुक्त करणेत येईल तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह) असुन देखील तिसरे अपत्य झाल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येईल.
५. भाषेचे ज्ञान :- ज्या अंगणवाडी मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका नियुक्ती करावयाची आहे, अशा अंगणवाडीमध्ये ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरिक्त इतर भाषा (उदा. उर्दु, हिंदी, माडिया, गौंड, कोकणी, पावरी, कन्नड, कोरकु, तेलगु, भिल्लोरी, बंजारा इ. पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथिल अंगणवाडीमध्ये मदतनीस यांच्या पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहिता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

टिप :- १. यापुर्वी या कार्यालयाकडे उपरोक्त पदासाठी केलेल्या जुन्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. नव्याने फेर अर्ज सर्व आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयाकडे सादर करावे.
२. अर्जाचा नमुना व अटी शर्ती ग्रामपंचायत स्तरावर देण्यात आहे. तसेच अर्जाचा नमुना व अटी शर्ती एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प अलिबाग कार्यालयात आलेल्या असुन प्रत ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.

दिनांक :-१२/०६/२०२३

सही /-
बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, अलिबाग

ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर

पनवेलमध्ये पळस्पेफाटा येथे रस्त्याच्या बाजूला असलेली ड्रेनेजची पाईपलाईन गाळाने भरलेली आहे.त्यामुळे ते सांडपाणी थेट रस्त्यावर आले आहे.त्याची दुर्गंधी सर्वत्र पसरली आहे. (छाया -राजेश डांगळे)

विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज सादर करावेत

अलिबाग : सन २०१८-१९ पासून महाडीबीटी प्रणालीमार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. पोर्टलवर अर्ज करताना येणाऱ्या विविध अडचणीमुळे अनेक विद्यार्थ्यांचे विहीत मुदतीत अर्ज भरता न येणे, अर्ज टो रिजेक्ट होणे, एखाद्या वर्षी अर्ज भरता न आल्यास त्यावर्षी गॅप ईयर असे पोर्टलवर नमूद होऊन पुढच्या वर्षीचा अर्ज भरण्यास अडचण येणे अशा बऱ्याच अडचणींचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागत आहे. त्यामुळे अनेक पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या दि.२४ मे २०२३ च्या शासन निर्णयानुसार सन-२०१८-१९ ते सन २०२१-२२ या कालावधीतील शिष्यवृत्ती, फ्रिशीप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज आपल्या संबंधित महाविद्यालयास दि.१५ जून २०२३ पर्यंत जमा करावयाचे आहेत. विद्यार्थ्यांनी वेळेत ऑफलाईन अर्ज महाविद्यालयात जमा करावयाचे असून ते अर्ज महाविद्यालयाने दि.२० जून २०२३ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे सादर करावयाचे आहेत, असे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुनिल जाधव यांनी कळविले आहे.

पान १ वरुन

अलिबागेत धडक कारवाई

पोलिसांनी गाजियाबाद येथून अब्दुल रहमान उर्फ नन्नी पुत्र महमूद अन्सारी या आरोपीला अटक केली. गाझियाबाद येथून अटक करण्यात आलेल्या आरोपीने पोलिसांच्या चौकशीत सांगितले की, महाराष्ट्रातील मुंबईला लागून असलेल्या मुंब्रा भागात शाहनवाज हा बनावट युजर आयडी बनवून त्याच्या माध्यमातून तो गेम खेळण्यासाठी उपलब्ध करून देत होता. या गेम मध्ये हरलेल्या हिंदू मुलांना तो कलमा वाचायला सांगून इस्लाम कबूल करण्यास भाग पडत होता. त्यांना कलमा वाचल्यानंतर तुम्ही कधीही गेम हरणार नसल्याचे अमिश दाखवत होता. मुंब्रा येथील देवरीपाडा येथे असलेल्या शाझिया इमारतीच्या पहिल्या मजल्यावर शाहनवाज मकसूद खान नावाचा व्यक्ती आपल्या कुटुंबासह राहत होता. गाझियाबाद पोलीस शाहनवाज मकसूद खानच्या शोध घेत असून त्याला अटक करण्यासाठी काही दिवसांपासून मुंब्रा येथील देवरी पाडा येथे आले. मात्र शाहनवाज मकसूद खान हा आपल्या कुटुंबासह कुठेतरी फरार झाला असल्याचे उघड झाले.

त्याच्या शेजारच्यांनी सांगितले की, त्याच्या घरात तीन भाऊ आणि आई असा परिवार आहे. त्याचा हर्बल शॅम्पू बनवण्याचा व्यवसाय आहे. गेल्या आठवड्यापासून त्यांच्या घराला कुलूप आहे. मात्र अद्याप कुठलेही पोलीस आले नसल्याचे शेजाऱ्यांकडून सांगण्यात आले. आज अलिबाग येथे आलेल्या पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले आहे. मात्र या प्रकरणी रायगड पोलिसांनी काहीही सांगण्यास नकार दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणी त्याचा भाऊ शहबाज खान यालाही ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसानी सांगितले.

राष्ट्रवादीत घराणेशाही- सुप्रिया

सुप्रिया सुळे यांनी दिली. कार्यकारी अध्यक्ष झाल्यानंतर घराणेशाहीची टीका विरोधकांकडून करण्यात येत आहे, याबद्दल प्रश्न विचारल्यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या, होय, ही घराणेशाहीच आहे. माझा जन्म ज्या घरात झाला, त्याचा सार्थ अभिमान आहे. मी शरद पवार आणि प्रतिभा पवार याची मुलगी असल्याचा सार्थ अभिमान आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्यकारी अध्यक्षांची निवड करणे याला भाकरी फिरवणे म्हणतात, असं मला वाटत नाही. ही तर निव्वळ धूळफेक आहे. राष्ट्रवादीतील फेरबदल किंवा अजित पवार नाराज असणे, हा त्यांच्या पक्षांतर्गत विषय आहे. मात्र, याला भाकरी फिरवणे म्हणत नाही. तर ही धुळफेक आहे. तो त्यांच्या पक्षाचा विषय आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

भाकरी फिरवली हे माध्यमांनी चालवलं

शरद पवार भाकरी फिरवण्याबद्दल काही बोलले का? भाकरी फिरवली हे माध्यमांनी चालवलं. देवेंद्र फडणवीस एका राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख आहेत. त्यांनी काय म्हणावं, हा त्यांचा अधिकार आहे. पण, पक्षांतर्गत भाजपाने काय करावं, हा त्यांचा प्रश्न आहे. तसा राष्ट्रवादीने काय करावं, हा आमचा अंतर्गत प्रश्न असल्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी म्हटले आहे.

गेलसाठी चौदा तास वीजपुरवठा खंडित

उच्च दाब वाहिनीच्या देखभालीच्या नावाखाली महाजने, बेलोशी, उसर, मुळखानाव, कुणे, घोटवडे, वावे, मल्याण, आंबेपूर, आंदोशी, सागवाडी, पाटवाडी, वळवली, चिंचोटी, दिवीपारंगी, रामराज, कुदे, सुडकोली, बापळे आदी गावांतील वीज पुरवठा शनिवारी सकाळी आठ ते सायंकाळी पाच यावेळेपर्यंत करण्यात येणार असल्याची सूचना दिली होती. परंतु गेल कंपनीत नव्याने उभारण्यात येणाऱ्या वीज खांबासह तारा बसविण्यासाठी या गावांमधील विद्युत सेवा खंडित केली होती. मात्र सकाळी चार वाजल्यापासूनच वीजसेवा बंद केली होती. कंपनीमध्ये काम सुरु असल्याने तब्बल चौदा तास विजेविना राहण्याची वेळ नागरिकांवर आली.

ऐन उन्हाळ्याच्या हंगामात वीज सेवा खंडीत झाल्याने नागरिकांचे प्रचंड हाल झाले. एका बाजुला उन्हाचा चटका बसत असताना, दुसऱ्या बाजुला विद्युत सेवा खंडित झाल्याचा त्रास या गावांतील नागरिकांना प्रचंड झाला. वीजसेवा बंद असल्याने थंड पाणी, थंड पेयापासून नागरिक दुरावले. पंखे, एसी आदी इलेक्ट्रीक साहित्य चालू नसल्याने अनेकांच्या अंगाची लाहीलाही झाली होती. विद्युत सेवा कधी सुरु होणार याकडे नागरिकांचे डोळे लागून राहिले होते. त्यामध्ये काही गावांमधील उभ्या असलेल्या बाजार पेठ्यांमधील दूध, आयस्क्रीम, थंडपेय विक्रेत्यांसह विजेवर चालणाऱ्या व्यवसांना प्रचंड फटका बसला. महावितरणच्या याकारभाराबाबत नागरिकांची संताप व्यक्त केला.

विश्व कसोटी : ऑस्ट्रेलिया अजिंक्य

करून ऑस्ट्रेलियाने विश्व कसोटी अजिंक्यपद सामन्यामध्ये विजयी झेंडा फडकवला. त्यामुळे आयसीसीच्या या स्पर्धेमध्ये भारताचा सलग दुसऱ्यांदा पराभव झाला. भारतासाठी कर्णधार रोहित शर्माने (४३), शुबमन गिल (१८), चेतेश्वर पुजारा (२७), विराट कोहली (४९), अजिंक्य रहाणे (४६), रवींद्र जडेजा (०), श्रीकर भरत (२३), शार्दूल ठाकूर (०), उमेश यादव (१), मोहम्मद शमी (१३) आणि मोहम्मद सिराजने फक्त एक धाव केली. ऑस्ट्रेलियासाठी स्कॉट बोलँडने अप्रतिम गोलंदाजी करून ३ बळी घेतले. घेतल्या. मिचेल स्टार्कने २, नेथन लायनला चार बळी घेण्यात यश आलं. पण कर्णधार पॅट कमिन्सला या इनिंगमध्ये एकाच बळीवर समाधान मानावं लागलं.

रायगड : मंदिरातील चोरी टाळण्यासाठी उपाययोजना

जिल्ह्यात अनेक ठिकाणी आहेत. अष्टविनायक मंदिर, चौलमधील रामेश्वर मंदिर , कनेश्वर मंदिर, आवास येथील नागेश्वर मंदिर, दिवेआगर येथील सुवर्ण मंदिर, श्रीवर्धनमधील हरिहरेश्वर अशी अनेक मंदिरामध्ये भक्तांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी आहे. जिल्ह्यातील वेगवेगळया गड किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज, सरखेल कान्होजी आंग्रेकालीन मंदिरे आजही वेगळ्या दिमाखात आहेत. अलिबाग तालुक्यातील चौल परिसरात तीनशेपेक्षा अधिक जुनी मंदिर आहेत. त्यामुळे हा भाग पर्यटनाच्या दृष्टीने उपयोगी ठरत असताना, देवदर्शनाच्या दृष्टीने एक वेगळी भावना निर्माण झाली आहे. मात्र गेल्या सहा महिन्यांपासून अलिबागसह अनेक भागातील मंदिरांना चोरट्यांनी लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. चौल - भोवाळे येथील दत्त मंदिरातील चांदीचा ऐवज चोरट्यांनी डिसेंबरमध्ये लंपास केला होता. त्यानंतर अलिबाग - पेण मार्गावरील पात्रुदेवी मंदिरात चोरी झाली होती. गेल्या पंधरा दिवसापूर्वी रेवदंडा परिसरातील थेरोंडा येथील खंडोबा मंदिर व दोन देवघरातील चांदीच्या मूर्तींची चोरी चोरट्यांनी केली. पात्रुदेवी मंदिर चोरी प्रकरण उघडकीस करण्यास अलिबाग पोलीसांना यश आले. त्यानंतर थेरोंडा येथील चोरी प्रकरण रेवदंडा पोलिसांनी उघड करून आरोपीला जेरबंद केले. मात्र चौल परिसरातील दत्त मंदिरातील चोरी अद्यापही उघड झाली नाही. हे मंदिर उंच टेकडीवर वसलेले असून डिसेंबर महिन्यात आजुबाजूच्या हजारो गावांतील भाविक तसेच मुंबई, पुणे व अन्य राज्यात नोकरी व्यवसायानिमित्त असलेले भाविक दत्त जयंतीला आवर्जून येऊन दर्शन घेतात. जिल्ह्यातील दोन मंदिर चोरी प्रकरण उघडकीस करण्यास रायगड पोलीसांना यश आले असले, तरीही जिल्ह्यातील मंदिरे असुरक्षीत असल्याचे समोर येऊ लागले आहे. मंदिरांना टारगेट करून मंदिरातील ऐवज लंपास करण्याच्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत. त्यामुळे रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी याबाबत मंदिर सुरक्षेच्या दृष्टीने कडक पाऊल उचलण्यास सुरुवात केली आहे.

मंदिर गावापासून किती अंतरावर आहे. त्याठिकाणी सुरक्षेच्यादृष्टीने काय उपाययोजना केल्या आहेत. विद्यूत व्यवस्था मुबलक प्रमाणात आहे, का, मंदिराच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे आहेत, का अशा अनेक प्रकारची तपासणी पोलीस ठाण्यातील पोलीसांमार्फत केली जाणारे आहे. मंदिराचे सुरक्षा ऑडीट केले जाणार आहे. तशा सुचना पोलीस ठाण्यांना देण्यात आल्या आहेत. मंदिराच्या परिसरात सुरक्षा भिंत, सुरक्षा रक्षक नेमण्यापासून विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतून मंदिरातील सुरक्षा मजबूत करण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला आहे.

निर्जनस्थळांवर नजर

अधिक आहे. डोंगराच्या पायथ्यासह अनेक दुर्गम भागात गावे, वाड्यांची वस्ती आहे. परंतू मुख्य रस्त्यावरून गावांपर्यंत जाण्यासाठी दोन ते तीन किलो मीटरचा प्रवास नागरिकांना करावा लागतो.

अलिबाग तालुक्यातील चिंचोटी येथील एक तरुणी संध्याकाळच्या दरम्यान मुख्य रस्त्यावरून गावात चालत जात होती. काळोखाचा फायदा घेत गेल कंपनीत कंत्राटीस्वरुपात काम करणाऱ्या तिघांनी या तरुणीवर अतिप्रसंग करून तिला ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र तिने सावधानता बाळगत त्या तिघांपासून ग्रामस्थांच्या मदतीने स्वतःची सुटका करून घेतली. या घटनेनंतर रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी महिला सुरक्षेच्या दृष्टीने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेली निर्जन स्थळे तसेच ज्या भागात महिलांची वर्दळ अधिक आहे. त्या भागांचा शोध सुरु केला आहे. निर्जन भागांची माहिती घेऊन महिलांचा वावर किती आहे, याची माहिती पोलीस ठाण्यांकडून मागविली जात आहे. ज्याठिकाणी रात्रीच्यावेळी अंधार आहे, त्याठिकाणी सीसीटीव्ही व पथदिवे लावण्याबाबत नगरपरिषद व ग्रामपंचायतींना बैठका घेऊन सुचना दिल्या जात आहेत. चिंचोटी येथील घटनेनंतर पुन्हा प्रकार घडू नये यासाठी पोलीस ठाण्यांमार्फत पोलीस गस्त त्याभागात वाढविली जाणार आहे. परिणामकारक गस्ती होण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. त्याची अंमलबजावणी प्रभावी व्हावी यासाठी ठोस उपाययोजना केल्या जाणार आहेत.त्यानुसार जिल्ह्यातील पोलीस ठाण्यातील अधिकारी, ग्रामपंचायत, नगरपरिषदेमधील अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. निर्जन स्थळे व महिलांची वर्दळ असलेल्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच निर्जन स्थळांवर पोलीसांची नजर राहणार आहे. चिंचोटी प्रकरणानंतर महिला सुरक्षेच्या दृष्टीने निर्जनस्थळे व महिलांची वर्दळ असलेल्या जागांची पाहणी करण्यात आली आहे. नगर परिषद, ग्रामपंचायतमधील पदाधिकारी, कर्मचाऱ्यांची तसेच पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांची बैठक घेऊन माहिती घेतली जात आहे. त्यानुसार लवकरच निर्जन स्थळांवर पोलीसांची नजर राहणार असल्याचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यानी सांगितले.

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
खुली ई - निविदा (एक लिफाफा पद्धत) माग्विणारी सूचना

कामाचे नाव: महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यामधील कोकण रेल्वे मार्गावरील रोहा ते ठोकुर अनुभागादरम्यान एफओबी/ आरओबी/ ओवरलाईन स्ट्रक्चरच्या बॉटम सरफेसवर हाय व्होल्टेज इंस्यूलेशन कंपाउंडचा पुरवठा आणि वापर. निविदा सूचना क्र. केआर/सीओ/ईएल/ इंस्यूलेशन/टी/9/23 दि. 12/06/2023. पूर्तता कालावधी: 12 (बारा) महिने. **अंदाजे मूल्य:** ₹ 2,68,10,994/- जीएसटी वगळता. **बोली सुरक्षा:** ₹ 2,84,100/- **निविदेच्या ऑनलाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ:** 03/07/2023 रोजी 15.00 वा. पर्यंत. **निविदेचे उघडणे:** 03/07/2023 रोजी 15.30 वा. फेरफार/ शुद्धिपत्रक जर असल्यास केवळ आयआरईपीएस संकेतस्थळावरच अपलोड करण्यात येईल. **निविदा कागदपत्राचे सादरीकरण:** आयआरईपीएस द्वारे. प्रत्यक्ष निविदा कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

निवडक

मोबाइल पळविला

पनवेल : रेल्वे स्टेशनमधील प्रतीक्षा कक्षात चार्जिंगला लावलेला मोबाइल चोरट्यांनी पळवल्याची घटना घडली आहे. आशिष रसाळ हा तरुण पुणे येथे जात होता. प्रगती एक्स्प्रेस गाडी येण्यासाठी वेळ असल्यामुळे तो रेल्वेच्या प्रतीक्षा कक्षात बसला होता. तेथे चार्जिंगला लावलेला मोबाईल चोरट्यांनी पळवून नेला. याविषयी पनवेल रेल्वे पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकाराने प्रवाशांमध्ये भीती निर्माण झाली आहे. सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

आरोपीला अटक

पनवेल : घरात आश्रय देऊन अत्याचार केल्याप्रकरणी खारघर पोलिसांनी खारघर येथील ३७ वर्षीय अन्वर बिस्मिला शेख याला अटक केली आहे. अन्वर त्याच्या कुटुंबासोबत खारघर गावातील हनुमान मंदिराजवळ राहत होता.अन्वरने पीडितेच्या असहायतेचा फायदा उचलून केलेल्या कृत्यामुळे खारघरमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.घरातील माणसे झोपली की आरोपी त्या महिलेवर अत्याचार करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

आरोग्य विषयक जनजागृती

चिरनेर : डाबर विटा तर्फे आरोग्य जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली असून, या मोहिमेचा एक भाग म्हणून, कोपरखैरणे येथील म्बिशन अकॅडमी येथे विशेष आरोग्य सत्र पार पडले. डाबरचे व्यवस्थापक दिनेश कुमार, ताप महाडिक, बेबीताई लांडगे, संतोष मोरे, कमलेश मुळीक, धीरज वाडकर, शवाजी राजीवडे आणि ३०० विद्यार्थी व शिक्षकवर्ग उपस्थित होते शिबिरात. मुलांना सकस आहार याविषयी माहिती देण्यात आली. यासोबतच त्यांना डाबर विटा असलेले विशेष हेल्थ किटही देण्यात आले.

डॉ.भामरे यांची नियुक्ती

अलिबाग : शासकीय तंत्रनिकेतन पेण या संस्थेचे प्राचार्य डॉ.एस.एस. भामरे यांची तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे सहसंचालक या पदावर दि. ३१ मे २०२३ रोजी नियुक्ती करण्यात आली. डॉ.एस एस. भामरे हे शासकीय तंत्रनिकेतन पेण या संस्थेत दि.११ ऑक्टोबर २०१८रोजी रुजू झाले होते. त्याआधी ते लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठ येथे कुलसचिव पदी होते.त्यांच्या या नियुक्तीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

अनुदानाचे प्रस्ताव पाठवा

अलिबाग : अल्पसंख्यांक विकास विभागाकडून शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. रायगड जिल्हयातील इच्छुक शाळांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता विहीत नमुन्यातील अर्जासह परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे ३० जुन २०२३ पर्यंत सादर करावेत. असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने संबंधितांना करण्यात आलेले आहे.

कोळगांव, मांडवा परिसरात सर्रासपणे

अवैध वाळूउपशाचे पेव

महसूल, पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष, मच्छिमारांमध्ये संताप

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मांडवा, कोळगाव परिसरात अवैध वाळू उपसा राजरोसपणे केला जात आहे. शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसवून वाळूमाफिया वाळूची चोरी करतात. या वाळू उपशामुळे मच्छिमारांचे प्रचंड नुकसान होत आहे. मासेमारीवर त्याचा परिणाम होत असून किनारी असलेल्या गावांना पुराचा धोका होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या अवैध वाळू उपस्यांबाबत महसूल प्रशासन व स्थानिक पोलीस प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र प्रशासनाकडून फक्त बघ्याची भुमिका घेतली जाते. प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याचा आरोप मांडवे येथील माता टाकादेवी मच्छिमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन, शेकापचे कार्यकर्ते अनिल भिंगारकर यांनी केला आहे.

(संग्रहित छायाचित्र)

> कोळगांव परिसरातील मांडवा बंदराच्या बाजुला मांडवा बंदर व आरसीएफ बंदरानजीक मोठ्या प्रमाणात वाळु उत्खनन केले जात आहे. या वाळू उपशामुळे समुद्रातील पाणी गढूळ होत आहेत. किनाऱ्याच्या भागात खड्डे पडत आहेत. मासेमारी व्यवसायवर खुप मोठा परिणाम होऊ लागला आहे. किनाऱ्यालगत येणारी मासळी खोल समुद्रात जाऊ लागली आहे. त्यामुळे मच्छिमारांवर मोठे संकट उभे राहिले आहे.
> - अनिल भिंगारकर, मच्छिमार सोसायटी अध्यक्ष

मांडवा बंदराला पर्यटनाच्या दृष्टीने दिवसेंदिवस महत्व प्राप्त होत आहे. या बंदराच्या काही अंतरावर बोडणी, कोळगाव, मांडवा गावे असून येथील नागरिकांचा व्यवसाय मासेमारी आहे. मासेमारी करून ही मंडळी उपजिवीकेचे साधन शोधत आहेत. मात्र कोळगांव, मांडवा परिसरातील समुद्रकिनाऱ्यालगत मोठ्या प्रमाणात वाळु उपसा केला जात आहे. जेसीबीच्या मदतीने वाळू काढून डम्पर ट्रकमधून वाहतूक केली जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले आहे.

जेसीबीमुळे होणाऱ्या वाळू उपशामुळे किनाऱ्याची धूप होऊन पावसाळ्यात समुद्राचे पाणी गावात शिरण्याची भिती निर्माण झाली आहे. गावांना पुराचा धोका नाकारता येत नाही. गावांच्या सुरक्षेसह मच्छिमारांचे नुकसान होऊ नये यासाठी मांडवे येथील माता टाकादेवी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन अनिल भिंगारकर यांनी महसूल प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. भविष्यात होणाऱ्या परिणामांचीदेखील जाणीव करून दिली आहे. तरीसुध्दा महसूल व पोलीस प्रशासनाकडून या वाळु उपस्यांविरोधात कठोर कारवाई केली जात आहे. वेगवेगळी कारणे सांगून आपला वेळकाढू पणा मांडवा पोलीस, मंडळ अधिकारी, तहसील कार्यालय करीत असल्याचा आरोप भिंगाकर यांनी केली आहे. त्यामुळे या वाळु उपस्यांविरोधात तातडीने कठोर कारवाई व्हावी अशी मागणी भिंगारकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या प्रकरणाबाबत मंडळ अधिकारी मोकल यांच्याशी संपर्क साधला, मात्र त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा संपर्क होऊ शकला नाही.

कर्जत : सुरेश टोकरें यांचे राजकीय भवितव्य उज्वल

आ.जयंत पाटील यांचे प्रशंसोद्गार

। नेरळ । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे यांचे राजकीय भवितव्य उज्वल आहे,असे प्रशंसोद्गार शेकाप सरचिटणीस आ.जयंत पाटील यांनी शनिवारी नेरळ येथे काढले.

टोकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.याच कार्यक्रमात नेरळ येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात लावणीस्टार गौतमी पाटील यांच्या नृत्याची झिंग पाहायला मिळाली. तिच्या दिलखेचक अदाकारीने अबालवृद्ध ही थिरकताना दिसले. मोठ्या जल्लोषात त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

माजी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश टोकरे यांच्या वाढदिवसाला ामदार महेंद्र थोरवे,मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील,भाजप नेते सुनील गोगटे,आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शेकापचे नेते जयंत पाटील यांनी आम्ही नाही तर शिवसेनेने महेंद्र थोरवे यांना आमदार केले.सुरेश टोकरे यांनी आपले देखील राजकीय वजन वाढविले आहे,त्यामुळे त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे.तर यावेळी अभिनेते दिगंबर नाईक यांनी कोकणातील देवाला गाऱ्हाणे घालताना टोकरे यांना यावेळी आमदार करावे असे गाऱ्हाणे घातले.

नेरळ येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात गौतमी पाटील यांच्या नृत्याच कार्यक्रम आयोजित केला होता. गौतमी पाटील,अभिनेते दिगंबर नाईक आदींनी उपस्थिती लावत सर्वांना आपल्या कलाशैलीने मंत्रमुग्ध केले.

तळवडे-पिंपळोली-काळेवाडी पूल मार्ग डांबराविनाच

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ -तळवडे-गुडवण- लोभेवाडी या रस्त्याचे मजबुतीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाचे माध्यमातून सुरु आहे.या रस्त्यावर तळवडे ते काळेवाडी पूल या भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी सहा महिन्यापूर्वी खडीकरण करण्यात आले आहे. अमात्र पावसाळा तोंडावर आला असताना देखील रस्त्यावर डांबर टाकण्यात येत नाही.दरम्यान, या रस्त्याचे डांबरीकरण कधी होणार याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने ठेकेदाराला सूट दिली आहे काय? असा प्रश्न स्थानिकांना पडला आहे.

ही काम आ. महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून मंजूर झाली आहेत.या रस्त्यावर तीन टप्प्यात दंबरीकरणाची कामे सुरु आहे. काळेवाडी पूल ते लोभेवाडी या रस्त्यावर डांबरीकरण पूर्ण झाले आहे. तर याच रस्त्यावरील तळवडे ते पिंपळोली ते काळेवाडी पूल या

भागात सहा महिन्यापूर्वी खडीकरण करण्यात आले होते. त्यावेळी या भागातील रस्त्यात असलेली पाईप मोऱ्या काढून नवीन टाकण्यात आल्या आहेत,मात्र त्या पाईप मोऱ्यांचे खाली सिमेंट काँक्रीटचा थर मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने टाकून घेतला नाही. त्याचा परिणाम तळवडे पासून काळेवाडी भागातील अनेक पाईप मोऱ्या यांच्या ठिकाणी आताच खादाडी निर्माण झाले आहेत. पावसाळयात त्या ठिकाणी मोठे भगदाड पडण्याची शक्यता असून ठेकेदाराच्या चुकीच्या नियोजनामुळे कदाचित पाईप मोऱ्यांचे ठिकाणी रस्ता खचण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे रस्त्यावर खडीकरण कारून सहा महिन्याचा कालावधी लोटला तरी कार्पे ट डांबरीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे वाहनचालक संतप्त असून आता पावसाळा तोंडावर आला असताना रस्त्यावर कार्पेट डांबरीकरण करण्यात आले नाही आणि त्यामुळे यावर्षी पावसाळयात या भागातील वाहनचालक यांना खड्डेमय रस्त्याने वाहतूक करावी लागणार आहे. सार्वजनाईक बांधकाम विभागाने ठेकेदाराकडून रस्त्यावर कार्पेट डांबरीकरण करून घ्यायला हवे होते.बांधकाम विभाग या ठिकाणी ठेकेदावरचे हित जपत असल्याने रस्त्यावरून वाहतूक करणाऱ्यांचे मात्र हाल होत आहेत.

वलप गणेशनगर रस्त्याची दुरवस्था

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल पंचायत समितीच्या आडमुठे धोरणामुळे तालुक्यातील वलप गणेश नगर नागरिकांना खड्यातून रस्ताचा मार्ग काढावा लागत आहे. येथील रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यांना मान, कंबर व पाठदुखीच्या आजाराने ग्रासाले आहे. तेव्हा गावासाठी असलेल्या गणेश नगर रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी अशी विनंती सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने गट विकास अधिकारी पनवेल पंचायत समिती यांच्याकडे निवेदनाने केली आहे.

वलप गणेशनगर गावासाठी एकमेव असलेला रस्ता खड्याट गेला असून या रत्यातून ग्रामस्थांना ये जा करावी लागत आहे. त्या रस्त्यावरून चालताना नागरिकांना जखमा होत असून पावसाळी रस्ता पाण्याखाली जात असल्याने ये जा करणे धोक्याचे होत आहे. तळोजा औद्योगिक विभागसाठी हा रस्ता पैसा व वेळ वाचविणारा असल्याने या रस्त्याचा जास्त वापर होत आहे. त्यात या गावात स्वयंभू गणेशाचे मंदिर असल्याने मंदिरात येणाऱ्या गणेश भक्तांची रस्त्यावर सतत वर्दळ चालू असते. दर्शनासाठी मुंबई, ठाणे, पालघर, पेण, उरण, रत्नागिरी व पुणे येथून गणेशभक्त येत असतात. असा हा गणेशनगर एमआयडीसी जोडणारा रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर चालणे मुश्किल झाले आहे. रस्त्यावर वाहन चालविताना छोटे मोठे अपघात होत आहेत. तर वाहन चालकांना मान, पाठ व कंबर दुखीच्या आजाराने त्रस्त केले आहे. या रस्त्याच्या दुरूस्तीसाठी गावकरी व गणेश भक्तानी वारंवार मागणी करून याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले आहे. तेव्हा या गावातील नागरिकांचा सहनभुतीपूर्वक विचार करून या रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावी अशी विनंती गणेश नगर ग्रामस्थांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते किरण पाटील यांनी पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे.

पावसाच्या आगमनासाठी बळीराजाचे साकडे

। पनवेल । वार्ताहर ।

उन्हाचा दाह वाढत चालला असून अधुन मधून ढगाळ वातावरण शेतकऱ्यास लवकर पाऊस येण्याचे संकेत देत आहे. याचीच प्रचीती म्हणून नुकतेच तुरळक पावसाचे आगमन झाले. यामुळे पावसाचे लवकर आगमन होण्यासाठी वरुण राजाकडे बळीराजास साकडे घालीत आहेत. कारण अशा ढगाळ वातावरणामुळे पावसाचे आगमन लवकर होणार असा अंदाज व्यक्त केला जात आहे

दरवर्षी शेतकरी शेती करीत करीत असल्यामुळे पावसाच्या आगमनाचे काही काही हालचाली शेतकरी जाणत असतो. मागील वर्षी अशा वातावरणात कधी पाऊस तर कधी उन पडत असल्याने चालु वर्षी मात्र शेतकर्यांना मोठ्या पावसाच्या आशा लागली असून काही शेतकरी ढगाळ वातावरणामुळे शेतीच्या कामात मग्न झाल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात पहावयास मिळत आहे. चालू वर्षी तरी पावसाने चांगली साथ द्यावी असे साकडे शेतकरी वरून राजाकडे करीत आहे. ढगाळ वातावरणामुळे आकाशात पावसाचे वातावरण निर्माण झाल्याने शेतकर्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र पावसाचे आगमन मोठ्याप्रमाणावर होत नसल्यामुळे शेतकरी चिंता ग्रस्त झाले आहे.

मृगाच्या पहिल्या सरी रायगडात कोसळू लागल्या आहेत. त्याची चाहूल दाखविणारे हे रंगबिरंगी आकाश. अलिबागच्या समुद्रकिनारी आकाशातील बदललेल्या रंगांनी सारा परिसर तांबूस झाला होता. (छाया – श्रेया फोटोज, अलिबाग)

अनधिकृत शाळांवर कारवाई करा-राष्ट्रवादी

। पनवेल । वार्ताहर ।

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणविभागाने पनवेल परिसरातील अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली आहे.करंजाडे मधील सहा शाळांचा यामध्ये समावेश आहे.अशा शाळांवर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे रंजीत नरुटे यांनी केली आहे.

या सहा शाळांमध्ये वेदिक ट्री प्री स्कुल, वेद ड्र्याप पब्लिक स्कुल, डॉल्फिन किड्स स्कुल,सेंट अँथनी इंग्लिश स्कुल, एस जी टी इंटरनॅशनल स्कुल, वेदगृह इंटरनॅशनल स्कुल आदींचा समावेश आहे.या शाळांमध्ये प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांसह पालकांची फसवणूक होण्याची शक्यता असल्याने याबाबत शिक्षण विभागाने तत्काळ कारवाईची मागणी शिक्षणाधिकारी तसेच स्थानिक पोलिसांकडे केली आहे.याबाबत पनवेल पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी एस मोहिते व पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना निवेदन दिले आहे.यावेळी रंजित नरुटे यांच्यासह राजू नलावडे, ओमकार जाधव, आदित्य साळवी, प्रथमेश मोडवे उपस्थित होते.

प्रा.एल.बी.पाटील यांचे प्रतिपादन

पुस्तके ही साहित्यिकांसाठी वैभवच

। पनवेल । वार्ताहर ।

पुस्तके ही साहित्यिकांसाठी वैभवच असल्याचे प्रतिपादन कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख, रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी केले. कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखा व के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय,पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलच्या के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालयात लेखक गज आनन म्हात्रे यांच्या मखाडीवरची माडीफ कादंबरीवर आयोजित चर्चासत्राच्या उद्घाटन

प्रसंगी ते बोलत होते. या चर्चासत्रात प्रमुख वक्ते ॲड. सुनिता जोशी, डॉ.अविनाश पाटील, योगेश लोहकरे, घनश्याम परकाले, सुधाकर लाड, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी सहभाग घेतला.

खाडीवरची माडी या कादंबरीचे लेखक गज आनन म्हात्रे यांनी, प्रेमात पडलो असतो तर काय घडले असते? याचे वास्तव चित्र माडीवरची खाडी या कादंबरीतील रेखाटलेले आहे. कथा घडली नाही घडावी असं वाटत होतं. पुस्तकात सुखाचे शब्द टिपले आहेत. कादंबरीमध्ये शोकांतिका ऐवजी सुखांतिका अशा स्वरूपात ही कादंबरी असल्याचे त्यांनी सांगितले.ख्याते योगेशचंद्र लोहकरे , डॉ.अविनाश पाटील ,ॲड.सुनिता जोशी , गजानन म्हात्रे, सुधाकर लाड , घनश्याम परकाले प्रा.एल.बी पाटील आदीनी आपले मनोगत व्यक्त केले. गणेश कोळी यांनी आभार मानले.

पळसदरी दुर्घटनेतील कुटुंबाला मदत

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पळसदरी कातकरी वाडी मधील पाणी आणण्यासाठी गेलेल्या मुलीचा अपघाती मृत्यू झाला होता. त्या मृत मुलीच्या मोठ्या बहिणीच्या शिक्षणाची जबाबदारी सामाजिक कार्यकर्त्या माधवी जोशी प्रतिष्ठानने घेतली आहे. तर या कुटुंबाला आर्थिक मदत देखील प्रतिष्ठान कडून करणेत आली. सारिका रामदास पिरकड या मुलीचा मृत्यू शहापूर कर्जत खोपोली या राष्ट्रीय महामार्ग येथून प्रवास करणाऱ्या वाहनाच्या धडकेत झाला होता. त्या अपघातानंतर सहा जून पासून पिरकड कुटुंबावर शोककला पसरली आहे.या कुटुंबावर कोसळल्यावर आघातानंतर

सामाजिक कार्यकर्त्या माधवीताई नरेश जोशी प्रतिष्ठान कडून मदतीचा हात देण्यात आला आहे.या प्रतिष्ठान कडून माधवी जोशी आणि नरेश जोशी यांनी पळसदरी वाडी मध्ये जावून पिरकड कुटुंबाची भेट घेतली. यावेळी स्थानिक ग्रामस्थ आणि पळसदरी ठाकूरवाडीतील सदस्य कृष्णा फिरकड आदी उपस्थित होते. जर रेल्वेच्या धरणातून पाणी उचलून जर पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील डोंगर भागात वसलेल्या आदिवासी वाड्यांची असलेली पाणी समस्या जर कायमस्वरूपी सुटणार असेल, तर तुम्ही येत्या दोन ते तीन दिवसात तसा परवानगी मिळण्याचा प्रस्ताव रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेऊन धरणातून पाणी उचलण्याची परवानगीची मान्यता मिळण्यासाठी सहकार्य करू असे आश्वासन जोशी यांनी दिले आहे.

भाकऱ्या फिरल्या

काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांनी आपापल्या पक्षात भाकऱ्या फिरवल्या आहेत. गेले काही दिवस महाराष्ट्र काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदावरून नाना पटोले यांना हटवले जाईल अशी चर्चा होती. ती बातमी अजून खरी झालेली नाही. पण मुंबई काँग्रेसच्या प्रमुखपदावरून भाई जगताप यांच्या जागी वर्षा गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाई जगताप यांचे कामगार संघटनांमध्ये काम आहे. अलिकडे त्यांनी सातत्याने आंदोलने करून त्यांनी पक्षात थोडी जान आणण्याचा प्रयत्न केला होता. पण देशभराप्रमाणेच मुंबई काँग्रेसमध्ये भरपूर गटबाजी आणि लाथाळ्या आहेत. मिलिंद देवरा यांना राहुल गांधी यांच्या भूमिका मान्य नाहीत. पक्षासाठी रस्त्यावर उतरून काम करण्याची तयारी नाही. तरीही काँग्रेसनेते म्हणून मिरवत राहून पक्षात काड्या करण्याचे त्यांचे उद्योग चालू असतात. मध्यंतरी एकीकडे महाविकास आघाडी शिंदे सरकारविरुद्ध आंदोलन करीत असताना देवरा आणि वर्षा गायकवाड शिंदे यांना जाऊन भेटले होते. आता त्याच वर्षा यांना नेतेपद दिले गेले आहे. त्या मागास समाजातील आहेत व धारावीतली एकनाथ गायकवाडांची पुण्याई त्यांच्या मागे आहे. आगामी पालिका निवडणुकीत याचा फायदा होऊ शकेल. मुंबईत शिवसेनेशी युती न करण्याची भूमिका जगताप मांडत होते. गायकवाड मात्र बहुदा सेनेशी जमवून घेतील. राष्ट्रवादी काँग्रेसमधील बदल अधिक व्यापक आहेत. सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल यांची कार्याध्यक्षपदी निवड करून शरद पवारांनी आपली मूळ योजना अमलात आणली आहे. महिनाभरापूर्वी कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे पवारांना अध्यक्षपदाचा राजीनामा मागे घ्यावा लागला होता. पण ती तात्पुरती माघार होती हे आता स्पष्ट झाले आहे. या बदलांमध्ये अजित पवार यांच्या वाट्याला काहीही आलेले नाही. इतर राज्यांसोबत महाराष्ट्राची जबाबदारी सुप्रिया सुळे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. शिवाय, तिकिटवाटपासाठी महत्वाच्या असणाऱ्या निवडणूक मंडळात त्या राहणार आहेत. त्यामुळे पवारांनी त्यांच्या पारड्यात आपले वजन टाकले आहे. अर्थात संघटनेत पदे देऊन कोणाही नेत्याचे सामर्थ्य वाढवता येऊ शकत नाही हे पवारांना चांगलेच ठाऊक आहे. काँग्रेसमध्ये पक्षश्रेष्ठींची मर्जी हीच पात्रता असलेल्या नेत्यांसोबत लढण्यात त्यांची हयात गेली. अजितदादांची प्रशासनावर आणि पक्षसंघटनेवर चांगली पकड आहे. मात्र काकांप्रमाणे सर्व थरांमध्ये व प्रदेशांमध्ये त्यांना लोकप्रियता मिळवता आलेली नाही. एकट्याच्या जिवावर ते आमदार निवडून आणू शकत नाहीत. नव्या बदलांवर तात्काळ प्रतिक्रिया देण्याचे टाळून दादांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. पण याहून पुढचे पाऊल ते टाकतील असे सध्या तरी वाटत नाही. ते काहीही असले तरी आपल्या डोळ्यासमोर पक्षातील नव्या नेत्यांची फळी तयार करण्याच्या शरद पवार यांच्या प्रयत्नांना दाद द्यायला हवी. शिवाय, मोदी सरकारच्या विरोधात अनेक पक्षांचे ऐक्य घडवण्याच्या प्रयत्नांसाठी त्यांना आता अधिक वेळ मिळू शकेल. त्या दृष्टीने हे बदल चांगले आहेत.

भाजपचा भेसूर चेहरा

महिला पहिलवानांनी दिल्लीत पुकारलेले आंदोलन पंधरा जूनपर्यंत स्थगित केले आहे. कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजपचे खासदार ब्रिजभूषणसिंग यांच्यावर महिला कुस्तीपटूंचा वारंवार विनयभंग केल्याचा आरोप आहे. याबाबत जानेवारीपासून आंदोलन चालू आहे. सर्वोच्च न्यायालयाने दणका दिल्यानंतर दिल्ली पोलिसांनी याबाबत तक्रार नोंदवून घेतली. मात्र त्यानंतर आजतागायत ब्रिजभूषणची चौकशी करण्याचे धाडस ते दाखवू शकलेले नाहीत. एरवी उत्तर प्रदेशातील योगी आदित्यनाथांनी बुलडोझर लावून तेथील गुन्हेगारांची घरे कशी पाडली याच्या कथा भाजपवाले मोठ्या अभिमानाने सांगत असतात. प्रत्यक्षात अशी घरे पाडणे हेही गैर असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहेच. पण ते असो. मात्र उत्तर प्रदेशातला एक खासदार योगी, अमित शाह आणि मोदी या सर्वांच्या वर दिसतो. त्याच्या केसालाही आजपर्यंत धक्का लागलेला नाही. कुस्तीपटूंनी याबाबत २३ एप्रिलपासून आंदोलन सुरू केल्यावर त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. उलट वृत्तवाहिन्यांमधून या कुस्तीपटूंवरच वेगवेगळे आरोप करण्यात आले. दरम्यान जागतिक कुस्ती महासंघाने या आरोपांची दखल घेतली आणि भारतीय कुस्ती महासंघ बरखास्त करण्याची धमकी दिली. शिवाय, नरेंद्र मोदी येत्या काही दिवसात अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यावेळी हे आंदोलन चालू असणे त्यांच्या प्रतिमेला शोभणारे नाही. त्यामुळे अखेर अमित शाह यांनी गेल्या आठवड्यात या कुस्तीपटूंना भेटीला बोलावले. त्यापाठोपाठ क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांच्यासोबत सहा तासांची बैठक झाली. पोलिस ब्रिजभूषण प्रकरणात पंधरा तारखेपर्यंत आरोपपत्र दाखल करतील आणि ब्रिजभूषण वा त्याचा कोणीही सगासोयरा कुस्ती महासंघाच्या निवडणुकीत उतरणार नाही असे आश्वासन सरकारने दिले. ही आश्वासने पाळली जातात की नाही हे पाहायला हवे. मोदींना किंवा भाजपला कुस्तीपटूंच्या मागण्यांबाबत काहीही पडलेले नाही. त्यांना आपल्या प्रतिमेची चिंता आहे. त्यासाठी त्यांना वेळ मारून न्यायची आहे. अन्यथा, संसद उद्घाटनाच्या दिवशी कुस्तीपटूंना फरफट नेणारे हे सरकार इतक्या सहजासहजी नमले नसते. भाजप एरवी कितीही लोकशाहीच्या बाता मारत असला तरी प्रत्यक्षात त्या पक्षाचा हाच भेसूर चेहरा आहे. विरोधकांना चिरडण्यासाठी कोणत्याही थराला जाणारा हा पक्ष आहे. महाराष्ट्रात शरद पवार यांना अमरावतीच्या एका भाजप कार्यकर्त्याने ठार मारण्याचा इशारा दिला. पवारांच्या राजकारणाबाबत मतभेद होऊ शकतात. पण अलिकडच्या काळात देशातील आणि राज्यातील विरोधी ऐक्यासाठी त्यांनी ठाम भूमिका घेतली आहे. त्यांच्याच मुळे महाराष्ट्रात पुन्हा सत्ता आणणे भाजपला सोपे राहिलेले नाही. त्यामुळे भाजपच्या वक्तव्यातून पवारांबद्दलचा द्वेष एरवीही ठिबकत असतो. आता तो प्रत्यक्ष व्यक्त झाला आहे. विशेष म्हणजे भाजपच्या प्रदेशाध्यक्षांनी त्यातही या धमकी देणाऱ्याला सावरून घेण्याचा प्रयत्न केला आहे. विरोधकांना खुनाची धमकी दिली तरीही त्या कार्यकर्त्याचे समर्थन करण्याची हीन पातळी भाजपने गाठली आहे. संस्कृतीच्या गप्पा मारणारे हे लोक देशात भीषण हिंसा आणि बकालीची बीजे रोवत चालले आहेत.

विचार

ऊसतोडणी कामगारांचा आज मुंबईत एल्गार

९०० ऊसतोडणी यंत्रे प्रत्येकी ३५ लाख अनुदानावर राज्य शासना तर्फे दिली जात आहेत याविरुद्धचा आवाज दाबण्यासाठी हे षडयंत्र साखर कारखानदार व पोलीस यंत्रणेने संगनमताने रचले आहे. या मजूरविरोधी व अन्यायकारक कार्यपद्धतीच्या निषेधार्थ व आयटक प्रणीत लालबावटा ऊसतोडणी कामगार, मुकादम आणि वाहतूकदार युनियनच्या वतीने उग्र आंदोलन पुकारण्यात येत आहे. दि १२ जून २३ मंत्रालयावर(आझाद मैदान येथे) सत्याग्रह आंदोलन युनियनच्या वतीने करण्यात येत आहे .

ऊसतोडणी कामासाठी दिलेली उचल/अडव्हान्स वसुलीसाठी ऊसतोडणी मजुरांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटना घडत आहेत. त्या पार्श्वभूमीवर या ऊसतोडणी मजुरांना रोजगारात घट झाल्याबद्दल आर्थिक मदत करण्याची आवश्यकता आहे. मात्र शिंदे-फडणवीस यांचे भाजप सरकार साखर कारखानदारांच्या दबावाखाली पोलीसयंत्रणेच्या माध्यमातून १५०० पेक्षा जास्त फसवणुक व विश्वासघाताचे गुन्हे ऊसतोडणी मुकादम यांच्यावर लादत आहेत. वास्तविक पाहता साखर कारखाना-वाहतूकदार- मुकादम- ऊसतोडणी मजूर हि कामगार-मालक संबंधाची साखळी आहे. मात्र सत्ता आणि पोलिसी बळाचा गैरवापर करून सदर बेकायदेशीर पद्धतीने गुन्हे नोंदविले जात आहेत. ९०० ऊसतोडणी यंत्रे प्रत्येकी ३५ लाख अनुदानावर राज्य शासना तर्फे दिली जात आहेत याविरुद्धचा आवाज दाबण्यासाठी हे षडयंत्र साखर कारखानदार व पोलीस यंत्रणेने संगनमताने रचले आहे. या मजूरविरोधी व अन्यायकारक कार्यपद्धतीच्या निषेधार्थ व आयटक प्रणीत लालबावटा ऊसतोडणी कामगार, मुकादम आणि वाहतूकदार युनियनच्या वतीने उग्र आंदोलन पुकारण्यात येत आहे. दि १२ जून २३ मंत्रालयावर(आझाद मैदान येथे) सत्याग्रह आंदोलन युनियनच्या वतीने करण्यात येत आहे अशी माहिती कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी दिली

महाराष्ट्र राज्यात सुमारे १० लाख पेक्षा जास्त ऊसतोडणी कामगार कार्यरत आहेत. निकृष्ट दर्जाचे जीवनमान जगत असलेल्या या कामगारांसाठी कोणतेही कायदेशीर संरक्षण व सामाजिक सुरक्षा अस्तित्वात नाही. ऊसतोडणी या कामाचा ड्हशर्वीश्रशव एाश्रीशपीं मध्ये देखील समावेश नसल्याने या कामाचे किमान वेतन देखील ठरविण्यात येत नाही. यंत्रांना रु ४०० ते ४२५ प्रति टन तर मनुष्यबळास केवळ २७३ रु प्रति टन मजुरीचा दर दिला जात आहे. महाराष्ट्रात सुमारे २२० साखर कारखाने कार्यरत असून त्यापैकी १०५ खाजगी साखर कारखाने आहेत. या मजुरांना कोणत्याही कायदेशीर तरतुदी व सामाजिक सुरक्षा लागू न करता साखर कारखाने राबवून घेत आहेत.

गळीत हंगाम २०२२-२३ या कालावधीत उसाचे एकरी उत्पादन घटले असल्याचे साखर आयुक्त यांनी जाहीर केले आहे. त्याचे गंभीर परिणाम ऊसतोडणी मजुरांना भोगावे लागत आहेत. यामुळे राबराबून देखील दिवसाकाठी उसाचे पुरेसे वजन न भरल्याने ऊसतोडणी मजुरांना दिलेली संपूर्ण उचल फिटेल एव्हढी मजुरी यंदाच्या गळीत हंगामात मिळाली नाही मोठ्या प्रमाणावर मजुरीत घट झाली आहे. हि वस्तुस्थिती आहे.

कॉम्रेड राजन क्षीरसागर

यामागे पुढील मुख्य कारणे आहेत १. गळीत हंगामाचा घटलेला कालावधी, २. उसाचे एकरी उत्पादनात घट : ३. ऊस तोडणी यंत्रांचा अनिर्बंध वापर, ४. ऊस तोडणी यत्रासाठीचा दर आणि मनुष्यबळ यामध्ये मोठी तफावत. ५.पैसा साखर कारखान्यांचा परंतु ऊस तोडणी कामगार आणि मुकादम यांची जबाबदारी घेण्यास कारखाना प्रशासनाचा नकार : साखर कारखाना व्यवस्थापन ऊसतोडणी कार्यक्रम राबविते ऊस तोडणीसाठी उचल देखील वाहन मालकांना करार करून देते मात्र कामगारांची कोणतीच जबाबदारी घेत नाही. मा गोपीनाथ मुंढे ऊस तोडणी महामंडळात कामगारांची नोंदणी करण्यास कारखाना व्यवस्थापन सहकार्य करीत नाही. ६.त्रिपक्षीय दरवाढ कराराची सदोष अंमलबजावणी : त्रिपक्षीय दरवाढ करारानुसार निर्धारित करण्यात आलेले दर व अन्य सुविधा यांचा प्रत्यक्ष लाभ कामगार व मुकादमांना देण्यात येत नाही. उदाहरणार्थ बसपाळी भत्ता याची तरतूद असताना देखील कामगारांना मजुरी अदा करताना हिशोबात धरली जात नाही

यामुळे यंदाच्या गळीत हंगामात सदर मजुरांकडे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी साखर कारखानदार आणि त्यांचे एजंट हे माफिया पद्धतीचा अवलंब करून हि रक्कम वसूल करण्यासाठी अपहरण, डांबून मारहाण, खंडणी वसूल करणे इत्यादी बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करीत आहेत. मराठवाड्यातील आदिवासी मागासवर्गीय आणि भटके विमुक्त या बाबत खालील घटना आपल्या निदर्शनास आणत आहोत अश्या प्रकारच्या शेकडो घटना चाळीसगाव, कन्नड, सिल्लोड, जाफराबाद, भोकरदन, मंठा, लोणार, जिंतूर, रिसोड, सेनगाव, औंढा, कळमनुरी तालुक्यात घडत आहेत. मराठवाड्यातील अजिंठा डोंगराच्या माळ असलेल्या तालुक्यात आणि प्रामुख्याने आंध, भिल्ल या आदिवासी व बंजारा जातीमधील मजुराबाबत घडत आहेत. अनेक प्रकरणात महाराष्ट्रातील पोलीस प्रशासनाचा व्यवहार त्यातील गुन्हेगारीकडे दुर्लक्ष करणारा आणि साखर कारखानदार धार्जिणा राहिलेला आहे. अशा घटनाबाबत दखल घेणे तर सोडाच पण पोलीस स्टेशन डायरीत नोंद देखील घेण्याचे टाळले जाते.

या दबाव तंत्राचा वापर करून महाराष्ट्र राज्य शासन राष्ट्रीय कृषीविकास योजनेच्या माध्यमातून सुमारे ९०० ऊस तोडणी यंत्रे आयात केली जात असून राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून प्रत्येक यंत्रासाठी रु ३५ लाख अनुदान राज्य शासन उपलब्ध करून देत आहे हि संतापजनक बाब आहे.

कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व प्रकार अत्यंत गंभीर असून मानवाधिकारांचे हनन व आदिवासी अत्याचाराच्या या घटनाकडे शासन यंत्रणा संपूर्णतः डोळेझाक करीत आहे. मा मुंबई उच्च न्यायालयाने सुरु केलेल्या ऊसतोडणी मजुरांवरील अत्याचार प्रकरणी सुमोटो रिट याचिकेतून हेच स्पष्ट होत आहे.

अशा या परिस्थितीत एका विशिष्ट संघटनेच्या मागणी वरून कोल्हापूर पोलीस प्रशासनाने २६२८ तक्रारी जमा करून १५० पेक्षा जास्त फौजदारी गुन्हे IPC अंतर्गत कलम ४०६ व ४२० अन्वये फसवणूक व विश्वासघाताचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर दाखल करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रभर अशाप्रकारचे १० हजार पेक्षा जास्त गुन्हे नोंदविले जाण्याची शक्यता आहे कोल्हापूर पोलीस प्रशासनाने शिबीर भरवून दाखल केलेल्या गुन्ह्यांची ही पद्धत अत्यंत पक्षपाती असून अन्यायकारक आहे. तसेच या प्रकारच्या केसेस मधून कोणतीही वसुली होवू शकत नाही केवळ आणि केवळ छळ केला जात आहे. याबद्दल तीव्र असंतोष ऊसतोडणी कामगारांमध्ये निर्माण झाला आहे. याच्या निषेधार्थ (आयटेक प्रणीत लालबावटा ऊसतोडणी कामगार, मुकादम आणि वाहतूकदार युनियनच्या वतीने महाराष्ट्रभर निषेध आंदोलन पुकारण्यात येत आहे. खालील मागण्यांसाठी दि १२ जून सोमवार रोजी आझाद मैदान मुंबई येथे सत्याग्रह आंदोलन करण्यात येत आहे.)

मागण्या :

१. कोल्हापूर पोलीस प्रशासनाने कामगार कायद्याशी विसंगत असतानाही दाखल केलेले फसवणूक व विश्वासघात याचे शेकडो गुन्हे व तत्काळ स्थगित करा अशा प्रकारे साखर कारखानदारांच्या दबावाने गुन्हे नोंदविण्याचे प्रकार बंद करा.

२. मा साखर आयुक्त कार्यालयाने जाहीर केल्याप्रमाणे यंदाच्या हंगामात उसाच्या वजन व एकरी उताऱ्यात झालेल्या घट लक्षात घेवून आणि वरील स्पष्ट केलेल्या वस्तुस्थिती आधारे प्रतिटन रु ५०/- विशेष भत्ता द्या शासनातर्फे सदर रक्कम मजुरांना थेट अदा करा.

३. ऊस तोडणी या रोजगारास ड्हशर्वीश्रशव एाश्रीशपीं मध्ये देखील समावेश करून मजुरांना हार्वेस्टर यंत्राप्रमाणे रु ४१९ रु प्रतिटन मजुरी किमान वेतन निर्धारित करा.

४. ऊसतोडणी व स्थलांतरित मजुरांसाठी स्वतंत्र कायदा माथाडी कायद्याप्रमाणे मंजूर करा. .!

५. मा.गोपीनाथ मुंढे ऊसतोडणी महामंडळाचे मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यात कार्यालय करून ग्रामपंचायतद्वारे ऊसतोड मजुरांची नोंदणी करा. .!

६. ऊसतोडणी मजुरांवरील थकीत उचल रकमेचे संस्थागत कर्जात रुपांतर करा. रिझर्व्ह बँकेच्या भूमिहीन किसानऋण योजना संबंधी मास्टर परिपत्रकाची राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका व राज्य सहकारी बँक यांच्या माध्यमातून अंमलबजावणी करा.

७. जि परभणी येथील जिंतूर तालुक्यातील आंध आदिवासी मजूर माणिक घोगरे यांच्यावर झालेल्या अत्याचाराबद्दल अट्रॉसिटी कायद्यानुसार अपहरण, डांबून मारहाण व खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या गुन्हेगारांना तत्काळ अटक करा. तसेच गोसावी पांगरी ता मंठा येथील प्रकरणात गुन्हा दाखल करा.

८. साखर धंद्यात ऊस तोडणी मजुरांना अपहरण, डांबून मारहाण यासारखे गुन्हे घडत असलेल्या शेकडो गुन्ह्याबद्दल चौकशी करण्यासाठी न्यायिक आयोग स्थापित करा. या न्यायिक आयोगामार्फत सर्व गुन्हेगारी व मानव अधिकार उल्लंघन केलेल्या घटनाबाबत गुन्हे दाखल करा. बेजबाबदार व आदिवासी विरोधी साखर कारखाना प्रशासना विरुद्ध कारवार्ड करा. पिडीत कुटुंबांना भरपाई द्या. सर्व प्रकरणे राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, डउ/डढ कमिशन या घटनात्मक दर्जाच्या यंत्रणेकडे सुपूर्द करा.

या आंदोलनासाठी परभणी बीड जालना हिंगोली वाशीम बुलढाणा नांदेड उस्मानाबाद औरंगाबाद धुळे इत्यादी जिल्ह्यातील कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत

आजकाल

कोल्हापूर-सलोखा हरवलेला नाही

विजय चोरमारे

एखादा प्रवाह अडखळल्यासारखा वाटतो याचा अर्थ तो थांबतो असे नव्हे. उमाळा असतोच तो संधी मिळाल्यावर पुन्हा झुळझुळायला लागतो. कोल्हापूर शहरात दोन दिवसांपूर्वी ज्या हिंसक घटना घडल्या त्यामुळे शाहू महाराजांच्या या नगरीला पुन्हा एकदा शरमेने मान खाली घालायला लावली. बिनडोकांचा उन्माद वाढला की तो कुठेही कसाही व्यक्त होतो. त्यातूनच काही लोक कोल्हापूर पुरोगामी नव्हे तर हिंदुत्ववादी असल्याचा टेंभा मिरवू लागले.

गोविंद पानसरे अण्णा आणि एनडी पाटील सर यांच्यानंतर कोल्हापुरातील सलोख्यासाठी पुढाकार घेणारी परंपरा खंडित झाली की काय अशी शंका व्यक्त केली जाऊ लागली. परंतु सहा तारखेचा किरकोळ गोंधळ आणि पोलिसांच्या हलगर्जीमुळे (सरकारच्या छुप्या समर्थनामुळे) झालेला सात तारखेचा हिंसाचार यामुळे कोल्हापूरचे समाजमन अस्वस्थ होते.

आठ तारखेला कोल्हापुरात व्यवहार सुरु झाल्यावर काल या शहरात काही घडले होते यावर विश्वास बसणार नाही अशी सुरळीत परिस्थिती होती. परंतु अनेक मनांवर झालेल्या जखमा खोल होत्या. त्यात ज्यांच्यावर हल्ले झाले, ज्यांचे नुकसान झाले असे गरीब लोक होतेच. परंतु घडलेल्या घटनांमुळे दुखावलेले विवेकी नागरिकही होते.

अशांपैकी काहींनी पुढाकार घेतला. अकबर मोहल्ला नामक मुस्लिम वस्तीत जाऊन तेथील लोकांशी संवाद साधून आम्ही तुमच्यासोबत आहोत असा विश्वास त्यांना द्यायचा असे ठरले. माजी नगरसेविका आणि मुलुखमैदान तोफ असलेल्या वक्त्या भारतीताई पोवार यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. एका ग्रुपवर त्यासंदर्भातील माहिती आल्यावर भारतीताईंना फोन केला. नेहमीप्रमाणे 'कशा आहात?' असे विचारल्यावर अजिबात बरी नाही म्हणाल्या. त्या तेव्हा पोलीस ठाण्यात होत्या आणि पोलीस त्यांना अकबर मोहल्ल्यात जाण्यापासून परावृत्त करीत होते. म्हणजे दंगलखोर टोळक्यांनी येऊन कोल्हापूरमध्ये हैदोस घालून गेले तेव्हा झोपलेले पोलिस सलोख्यासाठी जाणाऱ्या विवेकी नागरिकांना मज्जाव करीत होते. शेवटी पोलिसांना विचारात न घेता मोजक्या लोकांनी तिथे जाऊन संवाद साधण्याचा निर्णय घेतला. मीही आवर्जून या उपक्रमात सहभागी झालो.

आम्ही तीसेक लोक आणि मुस्लिम मोहल्ल्यातील विविध वयोगटातील साठ ते सत्तर लोक अशा शंभरावर लोकांनी संवाद साधला. आपल्यातील कुणी चुकीचे वागले तर आपण त्याला पाठीशी न घालता कायदेशीर कारवाईसाठी आग्रह धरूया, असे मत मुस्लिम समाजातील लोकांनी मांडले. घडले ते दुःखदायक आहे, ते घडायला नको होते. त्याबद्दल दिलगिरीही व्यक्त करण्यात आली. परस्परांमध्ये विश्वासाची भावना वाढीस लावणारा हा उपक्रम छोटा असला तरी अंधारात तेवणाऱ्या पणतीसारखा मौल्यवान होता. कोल्हापूरची शाहू विचारांची परंपरा पुढे नेण्यासासाठी नवी फळी पुढे येतेय हे स्वागतार्ह आहे. कोल्हापूरचा हा प्रवाह शहरात तर वाढत जाईलच पण महाराष्ट्रातही त्याचा विस्तार होईल याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

१) मावळा कोल्हापूर
२)शिवराज्य मंच कोल्हापूर
३)शाहूसेना कोल्हापूर
४) मोहनदास करमचंद गांधी विचारमंच कोल्हापूर
५) म.गांधी संरक्षण विचारमंच कोल्हापूर
६) अंधश्रद्धा निर्मूलन समिती
या संस्थांचे पदाधिकारी या उपक्रमात सहभागी झाले.

व्हायरल

मृगाचा पाऊस हाच शेतीसाठी खरा

वडील नेहमी सांगतात, रोहिणी नक्षत्राने अंडी गाळली तर मृर्ग नक्षत्र पाट झाडत असतो. अर्थात रोहिणी नक्षत्रात मान्सूनपूर्व पाऊस झाला तर मृर्ग नक्षत्रात पाऊस कमी होतो. कारण मान्सूनच्या पाऊस पाडण्यासाठी जे पोषक वातावरण हवे असते ते वातावरण रोहिणी नक्षत्रात पाऊस पडल्याने राहात नाही.

मृग नक्षत्रात पाऊस झाला नाही, तर शेती उत्पादनात घट होऊन शेतीवर परिणाम निश्चित होतो. कारण मृर्ग नक्षत्रात जो पाऊस पडून जमिनीत बियाणांची वाफण्यासाठी पोषक ओलावा आणि धूप तयार होत असते, त्यामुळे मृर्ग नक्षत्रात पाऊस होऊन पेरणी झाली केली, तर बियाणे वाफण्याचे (उघवणे) प्रमाण हे जवळपास ९० टक्क्यांपेक्षा जास्त राहते. शिवाय रोगप्रतिकार क्षमता देखील चांगली राहाते. मात्र मृर्ग नक्षत्रानंतर पेरणी झाली, तर या सर्वांमध्ये घसरण होऊन जाते.

मृग नक्षत्रला कृषी संस्कृतीमध्ये (शेतकरी-शेतमजूर) अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मृग नक्षत्राचे दिवस हे पुढील पूर्ण खरीप हंगामावर परिणाम करणारे असतात. मृर्ग नक्षत्र ८ जून रोजी सुरू झाले असून २२ जून पर्यंत आहे. या नक्षत्रामध्ये पडलेला पाऊस शेतीसाठी आणि शेती उत्पादनासाठी अमृताप्रमाणे असल्यागत असतो. या नक्षत्रात पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्याचे शंभर टक्के पदरात पडण्याची शक्यता निर्माण होते. यामुळेच शेतकरी मृर्ग नक्षत्राची वाट चातक पक्षासारखी बघत असतो.

-सोमिनाथ घोळवे

तमाम लोकांना नम्रपणे कळवण्यात येते कि , ३ मार्च १७०५रोजी औरंगजेब (बादशहा) याचे तेव्हाच्या अहमदनगर (आताचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर) जवळ वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले होते (जन्म १६१८).त्यांनी व्यक्त केलेल्या शेवटच्या ईच्छेनुसार त्यांचा म्रुतदेह खुलताबाद येथे नेउन दफन करण्यात आले आहे या गोष्टीला आता ३१८ वर्षे होउन गेली आहेत

त्यावरून क्रुपया आजच्या तारखेत म्हणजे ३१८ वर्षानंतर शांतता धोक्यात येणार नाही याची क्रुपया काळजी घ्यावी .परमेश्वर आपल्याला सद्बुद्धी देवो

-प्रकाश परांजपे

पीएम केअर आणि स्वयंसेवी संस्थांच्या मरणकळा

पीएम केअर फंडात बिगरसरकारी कंपन्यांनी , उद्योगसमूहांनी दिलेल्या देणग्या हा कागदावर खर्च असेलही,मात्र प्रत्यक्षात हि गुंतवणूक आहे.

हमखास परतवा देणारी गुंतवणूक.

पीएमकेअर फंडाच ऑडीट कॅग करणार नाही किंवा माहिती अधिकार कायदा फंडाला लागू होणार नाही हि तटबंदी या देणग्या देणाऱ्या उद्योगांना पुढे मिळणारा मलिदा आणि खिरापत उघड होऊ नये या साठीची तजवीज आहे.

आमदार खासदार खरेदी साठी दिवसाढवळ्या केलेली शासकीय लुट म्हणजे पीएमकेअर फंड.

लोककल्याणकारी राज्यकारभार सरकारने करावा हि अपेक्षा.

सगळीकडे सरकार पोहोचू शकत नाही हे वास्तव.

अनेक लोकांना आपल्याकडे असलेल्या पैशातून, वेळेमधून, कौशल्यामधून समाजासाठी काहीतरी करावेसे वाटते.बिगरसरकारी सामाजिक संस्था (एनजीओ) इथ अस्तित्वात येतात.

साहजिकच या संस्थामध्ये काम करताना अश्या अनेक गोष्टी सापडतात जिथे सरकारच अपयश, लबाडी, कावेबाजपणा उघडकीला येण्याची शक्यता असते.बऱ्याच संस्था सरकारवर अंकुश ठेवण्याच मोलाच काम करतात.साहजिकच या संस्था सरकारला अडचणीच्या ठरतात.

यांना दाबण्याचा मार्ग म्हणजे निधी बंद करणे.

बहुतांशी सेवाभावी संस्थाना वेगवेगळ्या उद्योगातून सीएसआर फंडातून पैसे मिळतात.अनेक स्थानिक उद्योग अश्या संस्थाना मदत करून स्थानिक पातळीवर संबंध चांगले ठेवतात.या उद्योगांना सीएसआर मधून पैसे पीएमकेअर फंडात टाकायला ' सूचना किंवा विनंती ' करण्यात आलेली आहे.

या सूचनेचा अर्थ सगळ्यांना उत्तम माहिती आहे.

शिवाय पीएम केअर ला दिलेल्या देणगीला आयकरातून सूट आहेच.परिणाम ?

बऱ्याच एनजीओ निधीअभावी बंद पडतील.

व्यक्तिगत देणग्या मिळवायला कोरोना नंतरच्या काळात खायचे वांधे झालेली माणस कसली देणग्या देणारेत ? अस कुणी देऊ म्हटल तरी त्यामध्ये मोठा फरक पडेल.

सबब पीएम केअर मधली सीएसआर ची तरतूद एनजीओ च्या मुळावर आलेली आहे.

यालाच मास्टरस्ट्रोक म्हणायचं.**-आनंद शितोळे**

लोकसंसद

बोगस बियाणे विकणाऱ्यांना १० वर्षाची शिक्षा होणार

पेरणीच्या हंगामात अनेकदा शेतकऱ्यांना बोगस बियांने देवून त्यांची फसवणूक करण्यात येतं असल्याच्या अनेक घटना सातत्याने समोर येत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांची बियाणांच्या बाबतीत होणारी फसवणूक थांबवण्यासाठी आता महाराष्ट्रात बोगस बियांने विकणाऱ्यांना १० वर्षाची शिक्षा होणारं असून यासाठी येत्या अधिवेशनात कायदा आणला जाणार असल्याची घोषणा कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली असल्याची बातमी वाचनात आली निश्चितच हा निर्णय बळीराजासाठी स्वागतार्ह म्हणावा लागेल कारण पेरणी हंगाम आला की अनेक फसव्या बियाणांच्या कंपन्यांचा सुळसुळाट वाढतो थोडाफार नावांत बद्दल करुन बियांने शेतकऱ्यांच्या माथी मारले जाते आपला देश कृषीप्रधान म्हणून जगामध्ये ओळखला जातो मात्र देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे लोटली तरी आजही शेतकऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक झालेली नाही ही शोकांतिकाच म्हणावी लागेल शेती व्यवसाय निसर्गावर अवलंबून आहे दिवसेंदिवस निसर्गचक्र बदलत आहे त्यामुळे शेती कशी पिकवायची हा सुद्धा प्रश्न ऐरणीवर आला आहे ऋतुमानानुसार पाऊस नाही,शेतीमालाला योग्य हमी भाव नाही, उत्पादन खर्च, फसवी बि - बियांणे, शेती धंदा बेभरवशाचा झाल्याने अनेक शेतकरी आत्महत्या सारख्या घटनेकडे वळतात त्याला कुठेतरी आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने घेतलेला निर्णय निश्चितच योग्य आहे मात्र हा कायदा अंमलात आणलेनंतर त्याची अंमलबजावणी कशी होते हे पहाणे मोठे औत्सुक्याचे ठरणारं आहे.

-राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव

प्रेरणा

शिक्षा

लालबुंद लज्जित मुद्रेने, भावकंपित स्वरात शिष्य गुरुदेवांना म्हणाला, गुरुवर्य, मी पापी आहे. मला शिक्षा द्या. त्याशिवाय माझ्या मनावरून अपराधाचं ओझं जाणार नाही.

गुरुदेव म्हणाले, असं तू काय पाप केलं आहेस, ते तरी सांग.शिष्य मान खाली घालून म्हणाला, जे जे करायला नको, ते सगळं मी मनात करतो. तुम्ही आमच्यासाठी जे जे वर्ज्य आहे म्हणून सांगता, त्या सगळ्याचं अनिवार आकर्षण माझ्या मनात जन्म घेतं. मला तेच पछाडून टाकतं. मी सदैव त्याचाच विचार करतो. ती सगळी कृत्यं माझ्या मनात घडून जातात.

गुरुवर्य म्हणाले, ही मानवी वृत्ती आहे. जे नाकारलं जातं, त्याचं अनिवार आकर्षण तयार होतं. जसजशी साधना पक्की होत जाते, तसतसे हे विचार, त्यांतून उद्भवणारे विकार निघून जातात. त्यात पाप ते काय?

शिष्य म्हणाला, नाही गुरुदेव. तुम्ही माझी समजूत काढताय. मनोमन आपण एवढ्या तीव्रतेने पापाचरणाचा विचार केला, तर पाप लागणारच ना?

गुरुदेव शिष्याचा हात धरून बाहेर एका रोपट्यापाशी घेऊन आले.ते रोपटं दाखवून म्हणाले, हे अत्यंत विषारी रोप आहे. याची दोन पानं खाल्लीस तर एका तासाच्या आत तुझा मृत्यू ओढवेल. आता इथे उभा राहा, याच्याकडे पाहा, त्याची पानं आपण खातो आहोत, अशी कल्पना कर. तुझ्या तर्कानुसार त्या काल्पनिक सेवनाने तुझा प्रत्यक्षात मृत्यू ओढवेलच. तेव्हा तू धाडकन् कोसळशील. मग आम्ही तुझी पुढची व्यवस्था करूच. हीच तुझी शिक्षा.

हे भन्नाट तर्कट ऐकून शिष्याच्या चेहऱ्यावर खूप दिवसांनी सुटकेचं आणि आनंदाचं हसू फुललं, गुरुदेवांच्या मिष्कील चेहऱ्याकडे पाहात तोही खुदुखुदू हसू लागला. **-ओशो**

निवडक

रस्ता दुरुस्तीची मागणी

मुरूड जंजिरा : मुरूड-मुंबई या मुख्य रस्त्याला जोडणारा विहूर पूल अत्यंत महत्त्वाचा आहे. असे असतानाही केवळ ३०० मीटर रस्त्याचे डांबरीकरण करण्यास बांधकाम खात्याला विसर पडल्याने अनेक प्रवाशांना धूळ तथा खाचखळग्यातून प्रवास करावा लागत आहे. रस्त्याची वेळीच डागडुजी न झाल्यास पावसाळ्यात रस्ता खड्डेमय होण्याची शक्यता नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

सल्लागारांची नियुक्ती

रसायनी: वरद ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेच्यावतीने विभागातील विविध क्षेत्रातील नामवंत व तज्ञ व्यक्तींची संस्थेच्या सल्लागारपदी नेमणूक करण्यात आली. संस्थेचे चेअरमन संदीप मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात नियुक्तीचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी गणेश काळे, प्रमोद राईलकर, अमित शहा, अनिल शहा, अनिल पिंगळे, शैक्षणिक सल्लागार डॉ. अनिल पाटील, ॲड. सचिन चाळके, विजय चौधरी व कुणाल पाटील उपस्थित होते.

विजेचा लपंडाव

पनवेल : तळोजा वसाहतीमधील काही भागांत शुक्रवारी रात्री विजेचा लपंडाव सुरू होता. पहाटे चार ते सकाळी अकरा वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित होत असल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले.तळोजा फेज एक वसाहतीमध्ये रात्री विजेचा लपंडाव सुरू होता. अशातच अजूनही पावसाने हजेरी लावल नसल्याने वातावरणातील उष्मा वाढलेला आहे. त्यामुळे एकीकडे असह्य असा उकाडा जाणवत असताना दुसरीकडे रात्रभर पंखे, कूलर, एसी बंद असल्याने रात्रभर जागरणाची वेळ रहिवाशांवर आली होती.

रवींद्र मगरचा सत्कार

पनवेल : आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळील पदपथावरील चहा विक्रेते रवींद्र मगर तसेच ठाण्यातून अब्बास खान यांची दिल्ली येथे झालेल्या या सत्कार समारंभासाठी निवड करण्यात आली होती. रवींद्र मगर यांनी प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत कर्ज घेतले होते. त्याची परतफेड व्यवस्थितरीत्या केल्याने केंद्र सरकारतर्फे होणाऱ्या सत्कारासाठी त्यांची निवड झाली. मगर यांनीदेखील कर्ज नियमाप्रमाणे फेडल्यामुळे केंद्र सरकारने त्यांचा सत्कार केला आहे.

महारोजगार मेळावा

पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या २४ जून या स्मृतिदिनानिमित्त नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून पनवेल येथे रोजगार महामेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. या संदर्भात शुक्रवारी (दि. ९) बैठक झाली. आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा फुले सभागृहात झालेल्या बैठकीत रोजगार महामेळाव्याच्या नियोजनासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

दिन वार्ता

पंचांग

१२ जून २०२३, सोमवार
विक्रम संवत२- २०७९
ज्येष्ठशके संवत२- १९४५
संवत्सर - शोभननाम
अयन- उत्तरायण
मास- ज्येष्ठ
ऋतु- ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:नवमी १०:३४:५७
नक्षत्र:उत्तराभाद्रपद १३:४९:३६
योग:आयुष्मान ०७:५२:३४
करण:गर १०:३४:५७
करण:वणिज २१:५८:५४
सूर्य:वृषभ
चन्द्र:मीन
हिजरी सन२ - १४४४
मुस्लिम मास - जिल्काद
तारीख - २३
विशेष
पारशी बेहमन मासारंभ
राजमाता जिजाऊसाहेब भोसले पुण्यतिथी

सुडोकू

	6		1	4	8			7
				3		8		2
		3					4	6
	9		4	8	6	5		
		6	2		5	9		
		4	3	7	9		1	
7	4					2		
6		8		5				
5			8	2	4		6	

PRESS SERVICES OF INDIA

रविवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

7	8	6	5	4	3	9	2	1
3	1	4	2	9	6	8	5	7
9	2	5	7	8	1	4	3	6
8	4	3	1	5	9	6	7	2
2	5	1	6	7	8	3	4	9
6	9	7	3	2	4	1	8	5
1	6	2	4	3	7	5	9	8
5	3	8	9	6	2	7	1	4
4	7	9	8	1	5	2	6	3

कृषी विभाग देणार परसबागेला नवसंजीवनी

। तळा । वार्ताहर ।

परसबागेतील भाजीपाला ही संकल्पना तशी नवी नाही, ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात परसबागेत सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला केला जात होता. रोजच्या आहारातील भाजीपाल्याची गरज त्यातून भागवली जात होती, त्यामुळे लोकांचे आरोग्य उत्तम राहत होते व आर्थिक बचत सुद्धा होत होती. परंतु कालांतराने परसबाग संकल्पना हळूहळू नामशेष होत चालली आहे. त्यामुळे तळा तालुक्याला पुणे व मुंबई येथील भाजीपालावरती अवलंबून रहावे लागत आहे. बाहेरून येणाऱ्या भाजीपाल्यावरती मोठया प्रमाणात कीटकनाशकांची फवारणी केलेली असते, त्यामुळे कर्करोगा सारख्या महाभयंकर रोगाचे लोण आता ग्रामीण भागापर्यंत आलेल दिसून येते.

ग्रामीण भागात शेताच्या बांधावर शेती, सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला

ग्रामीण भागात शेताच्या बांधावर किंवा ओसाड माळरानावर पावसाळी शेतकरी वर्ग थोड्याफार प्रमाणात भाजी, कंदमुळे लागवड करीत असतात.

काहिना जागेचा आभावामुळे लागवड कारता येत नाही. यामुळे नाईलाजाने बाजारपेठेत उपलब्ध होत असलेला भाजीपाला खरेदी करावा लागतो. या सर्व बाबींवरती मात करण्यासाठी तळा तालुक्यामध्ये आत्मा व कृषी विभागामार्फत परसबाग सकल्पनेस बळ देण्यात येत आहे.

परसबाग भाजीपाला किट वाटप करण्यात येणाऱ्या लाभार्थींना बियाणे लागवड पासून ते फळ येण्यापर्यंत काळजी कशी घ्यावी यांचे सखोल मार्गदर्शन कृषी सहाय्यक यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

या भाजीपाला किटमध्ये मिरची,चवळी, दोडका, काकडी, भेंडी, कारले, गोसाळे आदिचे बियाणे मोफत वाटप करण्यात येत आहे.

> कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मार्फत तळा तालुक्यासाठी २७०० भाजीपाला किटचे वाटप करण्यात येत असून यामुळे शेतकरी किंवा नागरिक आपल्या घरासमोर किंवा घराच्या बाजूला भाजीपाला लागवड करु शकतात यामुळे आपल्या आहारात ताजी व सेंद्रिय भाजी मिळणे शक्य होईल यासाठी थोडीशी मेहनत घेतल्यास आपणांस मोठ्या प्रमाणावर भाजी मिळेल व त्या माध्यमातून आर्थिक बचत होईल व आरोग्य सुद्धा निरोगी राहण्यास मदत होईल.
>
> –आनंद कांबळे
> तालुका कृषी अधिकारी

या मोहिमेचाच एक भाग म्हणून तळा तालुक्यातील मौजे खांबवली येथे आदिवासी बांधवाना परसबाग किटचे वाटप करण्यात आले. यावेळी कृषी पर्वयेक्षक सचिन जाधव, कृषी सहाय्यक दिनेश चांदोरकर, सहाय्यक तंत्र व्यवस्थापक सचिन लोखंडे यांनी उपस्थित आदिवासी बांधवाना बियाणे लागवडीपासून ते फळ येण्यापर्यंत काळजी कशी घ्यावी यांचे सखोल मार्गदर्शन केले.

व्यावसायिकांना ओळखपत्राशिवाय प्रवेश देऊ नये

। पेण । प्रतिनिधी ।

पेण शहरात सध्या मंदिरांत चोरीच्या घटना वाढल्या आहेत, तसेच अनोळखी व्यक्तींकडून व्यवसायाच्या बहाण्याने रेकी केली जात असल्याचा संशय व्यक्त करीत अशा व्यावसायिकांना ओळखपत्राशिवाय शहरात प्रवेश देऊ नका, अशी मागणी येथील सकल हिंदू समाजबांधवांनी नगर परिषदेकडे केली आहे.

प्रशासन अधिकारी किरण शाह यांना निवेदन देण्यात आले आहे. येथील चावडी नाक्यावर एका व्यावसायिकाने बॅनरवर पाय दिला होता. तो बॅनर गणपतीचा होता. ही बाब निदर्शनास आणल्यानंतरही त्याने उद्धटपणा केला.

हिंदू समाजबांधवांची नगरपरिषदेकडे मागणी

नागरिकांचा रोष पाहून तो पळून गेला, तसेच मंदिरांत चोरीच्या घटनाही वाढल्या आहेत. यामुळे हे निवेदन देण्यात आले आहे. यावर लवकरच संबंधितांची बैठक घेऊन यामधून शहर सुरक्षा व बाहेरील येणारे नागरिक यांच्याबाबत काय करावे लागेल यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

नोकरीत स्थानिकांना प्राधान्य द्या : घरत

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यात अनेक विविध राष्ट्रीय प्रकल्प आहेत, कंपन्या आहेत, गोडाऊन आहेत. मात्र, तेथे प्रकल्पग्रस्त व स्थानिक भूमीपुत्रांना नोकरीत न घेता, परप्रांतियांची भरती केली जाते. त्यामुळे स्थानिक भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त बेरोजगार होत आहेत. ही समस्या लक्षात घेऊन स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्यात यावे, या मागणीसाठी कामगार नेते तथा काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी जेएनपीएच्या सेक्रेटरी व वरिष्ठ प्रबंधक मनिषा जाधव यांची भेट घेतली.

यावेळी विविध समस्यांवर व नोकऱ्यांसंदर्भात महेंद्र घरत यांनी चर्चा करून स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरीत प्राधान्य देण्याची विनंती केली. यावेळी मनिषा जाधव यांनी महेंद्र घरत व त्यांच्या शिष्टमंडळाला सकारात्मक प्रतिसाद देत स्थानिक भूमीपुत्र व प्रकल्पग्रस्तांनाच नोकरीत प्राधान्य देणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जेएनपीएचे विश्वस्त रवींद्र पाटील, मार्तंड नाखवा, किरीट पाटील, कमलाकर घरत, रेखा घरत, निर्मला पाटील, एकनाथ घरत, जयवंत पाटील, संजय ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, भालचंद्र घरत, रोहित घरत, लंकेश ठाकूर, हितेन घरत, अब्दुल शिलोत्री, विनोद पाटील, आदित्य घरत आदी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

अमृत सरोवर तलावांची पाहाणी

। रसायनी। वार्ताहर ।

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत मोहोत्सवा निमित्ताने केंद्र सरकार पुरस्कृत अमृत सरोवर तलावांची पाहाणी तहसीलदार आयुब तांबोळी व गटविकास अधिकारी राजपूत यांनी संयुक्तरित्या करून कामाचा आढावा घेतला.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना केंद्र सरकारने गाव तलाव गाळ मुक्त करून पाणी साठा वाढ करण्याचा संकल्प केला होता. आणि त्याच ठिकाणी राष्ट्रीय ध्वजस्थंभ उभारले होते. यावेळी गावांतील तलावांची माहिती उपलब्ध करून तलाव परिसर सुशोभीकरण करणे, तलाव गाळ मुक्त करणे आणि त्याच अनुषंगाने पाण्याची पातळी वाढविण्यासाठी गावातील शेतकरी यांनी तलावातील गाळ काढून आपल्या शेतात शेंद्रिय खत टाकून पिकाचा दर्जा व वाढीव उत्पादन घेण्यासाठी प्रयत्न करण्याचा उद्देश होता.

खालापूर तालुक्यात एकुण वीस तलावांची निवड गटविकास अधिकारी खालापूर, ग्रामीण पाणपुरवठा विभाग, जलसंधारण विभाग आणि मृद व जलसंधारण विभाग यांनी केली असून त्यांनी केलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाचे आयुक्त यांनी सूचना केली आहे.

गेले दोन दिवस तहसिलदार आयुब तांबोळी, गटविकास अधिकारी राजपूत हे अमृत सरोवर तलावांची पाहाणी करुन केलेल्या कामांचा आढावा घेत आहेत. चौक येथील तलावाची पाहाणी करताना रितु ठोंबरे व त्यांचे सहकारी, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, विस्तार अधिकारी शैलेन्द्र तांडेल, उपअभियंता पाणी पुरवठा संतोष चव्हाण, मनरेगाचे तांत्रिक सहायक लोकेश देशमुख, जलसंधारण उपअभियंता हर्षल पाटील, ग्रामविकास अधिकारी एस. पी. जाधव यांच्यासह त्यात्या विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा

। पातळगंगा । वार्ताहर ।

जून महिन्यातील दहा दिवस संपले तरी पावसाची चिन्हे नाहीत. उष्म्यामुळे सर्वसामान्य हैराण झाले आहेत. मशागतीची कामे पूर्ण झाली असून पेरणीसाठी शेतकरी पावसाची चातकासारखी वाट पाहत आहेत.

खालापूर तालुक्यात दोन दिवसांपासून उन्हाच्या झळा तीव्र झाल्या असून सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विजेचा लपंडाव सुरू आहे. परिणामी घामाच्या धारांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. दुपारी बारानंतर नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळत असल्याने रस्ते, बाजारपेठांमध्ये शुकशुकाट जाणवतो. तालुक्यात शेतकऱ्यांची मशागतीची कामे पूर्ण झाली आहेत, मात्र पावसाची संकेत अद्याप दिसत नसल्याने पेरणीस सुरुवात केली नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

शब्दकोडे क्र.१५०



आडवे शब्द :१.दार,कवाड,द्वार३.नव्यानेच सेनेची घोषणा९.जाडा,भारदस्त१०.हिंदीत भाऊ१२.लहान मुल,बालक१३.त्रास,कष्ट१५.संगीतातील सात स्वर१६.हार,माळ१७.उघडी,काहीही न नेसलेली१८.पसंद,रस१९.हव्यासी,जास्त हाव असलेला२०.चंद्राचा सोळावा भाग२१.रतीपती२२.माज,रग२३.ज्याला यश नाही असा२४.दया,करूणा२५.गाजावाजा,बोभाटा२८.व्यसन,लत२९गृहीत धरने या अर्थी३०.खंडोबाला वाहीलेले स्त्री पुरूष३२.तरू,वृक्ष३३.वरचेवर,वरकरणी३५.भकास,उनाड३६.कठीण३९.नरम च्या विरूध्द४१.आवड,फळातील द्रव भाग४२.भास्कराचायारचा गणितशास्त्रावरील प्रसिध्द ग्रथ ४३.विनंती,आर्जव४६.जंगल,अरण्य४८दिवस,आघात४९.जू५१.सैन्याचादादागोटा५४.फासा ,पिंजरा५६.कब्जा५७.आवरण,सालपट५९.गाडीवरील आच्छादन६१.उणे,कमी करणे६२.मोठे वादय६३.वाचा६४.बांग्लादेशाचे चलन६६.मासा पकडण्याचा आकडा६७.उष्ण,कोमट६८.भार,ओझे७०.भांडण७२.एक स्वयंप्रकाशीत किटक७३.तारा,नक्षत्र७५.एक मौल्यवान लाकुड७६.उणीव,ददात७७.लाज,लज्जा७८.जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध

उभे शब्द:१.राजसभा भरण्याचे ठिकाण२.दावा दाखल करणारा,चाबुकाची लांब चामडीपट्टी३.रोख,पैसे देऊन४.महल,प्रासाद५.मारून मुटकून,इच्छा नसताना६.भारताच्या दक्षिणेकडील एक भव्य सागर७.प्रत्येक,हर,भाव८.विस्तीर्ण,पसरलेले९.हिंदीत छायाचित्र१०.बाळाला दिला जाणारा डोस१३.लाग,दम,धीर१४.फळाचे वरील संरक्षक कातडे२०.कपटी म्हणला की त्याच्या मनात --- हे आलेच२३.अलि,वात्रट२६.गवळी चे ग गाळा२७.सुताराचे लाकुड तासण्याचे एक हत्यार२९.पक्का रस्ता,संजय दत्त-पुजा भटट यांचा एक प्रसिध्दचित्रपट३०.संपत्तीचा हक्कदार३१.मुरली धारण केलेला३४.नवरा मुलगा३५.ओतुन तयार केलेले३७.ख्रिश्चन धर्मपरिचारीका३८.फटीतून आत येणारा प्रकाश४०.उतरण,टेकडीची उतरण ४४.आईचे किंवा वडीलांचें वडील४७.आश्चर्य४८.लहान मुलांच्या पायात घालावयाचा एकअलंकार,'पार्वतीच्या बाळा तुझया पायात --' एक श्रीगणेशगीत५०.कोलकात्याचे एक विमानतळ५२.सटवाई५३.दार,कवाड५५.पिकलेला५६.तवाना,टवटवीत५८.केस विंचरण्याचा लहान आणि बारीक कंगवा६०.लवकर,जलद६१.अंगावर मारल्याची खुण६२.उदयानंतरचा दिवस६५.कर्म,काज६७.वादयांचा आवाज६८.मांजराचा जोडीदार७१.कविता करणारा७२.दुभत्या गाईची ओटी७३.धातुचे सूत७४.एक विदेशी दारू७५.सन,शके

शब्दकोडे क्र.१४९ चे उत्तर

आडवे उत्तर :
१.हिंदी महासागर ६.खबर ८.दरवाजा ११.हातमाग १३.नरम १४.कब १५.जीन १६.लता १७.सवड १८.कव १९.कावळे २०.आम २१.धवल २२.कोळसा २३.नश्वर २५.कम २६.समय २७.आरसा २९.रम ३०.तरफ ३१.कावड ३३.लाश ३५.जागरण ३७.विनर ३८.काळ ३९.वर्तमान ४१.रममाण ४२.समई ४४.कोंब ४६.सवाल जवाब ४९.राजा ५१.काव ५२.रव ५४.कट ५५.रसद ५६.ईनमीनतीन ५८.रवाना ६०.रकम ६२.सम रसता ६४.कफ ६५.मलम ६७.राम ६९.टका ७१.गनीम ७३.कजाग ७४.शेर ७६.तरतरीत ७८.रूक्ष ७९.बरका ८०.रत ८१.हरकतदार ८२.गहु

उभे उत्तर
१.हिंदी २.महाबळेश्वर ३.हात ४.सामाजीक ५.गगन ७.बक ८.डगर ९.रम १०.जानवसा १२.तलम १३.नवल १४.कवन १७.सवय १८.कळसा २०.आमरण २१.धमणी २२.कोरड २४.रमजान २५.कतरण २७.आवर २८.तलाव ३१.वन ३२.सळई ३४.शर्त ३६.सरबराई ३७.विमान ३८.काम गार ४०.माधवा ४३.गाजर ४५.सवती मत्सर ४६.सटर फटर ४७.वासरमणी ४८.बदक ५०.जाणता राजा ५१.कानस ५३.वक्रता ५७.नर ५९.नाम ६१.मस ६३.समशेर ६६.लगत ६८.मगरूर ७०.कातर ७२.मकर ७३.कनात ७५.रकाना ७६.तवा ७७.रीत ७९.बहु

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

पावसापूर्वी घरांची डागडुजी

रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांची संख्या अधिक

। पनवेल । वार्ताहर ।

पावसाळा सुरू होण्याआधी सोसायटी, घरातील किरकोळ कामांना सुरुवात होते. यासाठी ठिकठिकाणी घरातील रंगकाम, किचन, बाथरूम यांची कामे सुरू आहेत. तसेच पावसाळ्यात गळती होणार नाही, याची काळजी घेण्यासाठी डागडुजीही केली जात आहे. याशिवाय पावसाळ्यात विजेची समस्या निर्माण होऊ नये, याकरता वायरिंग दुरुस्तीही करण्याच्या कामांना वेग आला. त्यामुळे रंगारी, गवंडी, बिगारी, हार्डवेअर कामगारांना सुगीचे दिवस आले आहेत.

समाजात काही असे घटक आहेत ज्यांना रोजच्या दैनंदिन रोजगाराची भ्रांत पडलेली असते. वर्षाचे बाराही महिने त्यांना दिवसाच्या रोजगारासाठी झटावे लागते; मात्र पावसाळ्याच्या तोंडावर त्यांना हमखास कामे मिळू लागता. खारघरमध्ये जवळपास एक लाख सोसायटी आणि घरे आहेत. पावसाची शक्यता केव्हाही पडण्याची असल्याने घरे, तसेच इमारती, सोसायटी, दुकाने यांच्या डागडुजीच्या कामांना वेग आला आहे. पावसाळ्यापूर्वी घरातील रंगकाम, किचन नूतनीकरण, सोसायटी आणि घरातील पाण्याची टाकी स्वच्छ करणे, सोसायटीच्या आवारात निखळलेल्या टाईल्सचे कामे मोठ्या प्रमाणात केली जात आहेत.



किचन, बाथरूमची कामे आणि रंगकाम वेळेवर व्हावी, यासाठी गवंडी, रंगारी आणि रंगारी कामगारांना मोठी मागणी आहे. मात्र, त्यांच्या दैनंदिन मजुरीत वाढ झाली आहे.

गवंडी दिवसाला १२०० ते दीड हजार, रंगारी प्रति दिवस एक हजार रुपये, तर बिगारी ८०० ते हजार रुपये मागणी करत आहे. खारघर येथील कामगार नाक्यावर महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, उत्तर प्रदेश, बिहार येथील गवंडी, बिगारी, रंगारी, साफसफाई आदी रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांची संख्या अधिक आहे. पावसाळ्याच्या तोंडावर कामगारांना अधिक मागणी असल्यामुळे त्यांना सध्या सुगीचे दिवस आले आहे.

वीज समस्यांची कामे

बहुतांश सोसायटीमधील वीजमीटर; तसेच भिंतीशेजारी उंदरांनी छिद्र पाडले आहेत. पावसाळ्यात वीजवाहिन्यांमध्ये समस्या उद्भवू नये, यासाठी ही छिद्रे बुजवण्यासाठी सिमेंटची कामे केली जात आहे. त्यामुळे मजुरीच्या दरात वाढ झाली आहे. कामगार सांगेल तो दर देवून कामगारांना आणण्याची वेळ ठेकेदारावर येत आहे.

निवडक

फेरीवाल्यांची घुसखोरी

पनवेल : खारघर परिसरात रस्ते तसेच पदपथांवर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांकडून दैनिक बाजारच्या नावाखाली पालिका पन्नास रुपये घेत आहे. तसेच या फेरीवाल्यांना पालिकेकडून अधिकृत पावती दिली जात असल्यामुळे खारघर परिसरात बेकायदा फेरीवाल्यांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. खारघर वसाहतीत बँक ऑफ इंडियाकडून शिव मंदिर आणि नवरंग सर्कलकडून गोखले शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याच्याकडेला पथविक्रेत्यांच्या अतिक्रमणामुळे रस्ते आणि पदपथ व्यापले गेले आहे.

कामगारांना सुगीचे दिवस

रसायनी : मागील दोन-तीन दिवसांपासून खोपोली-खालापूर परिसरात ढगाळ वातावरण असल्याचे पाहायला मिळत आहे. हवामान विभागाकडूनही मान्सून सक्रिय होत असल्याचे वर्तवले जात आहे. या पार्श्वभूमीवर परिसरात मान्सूनपूर्व कामांची लगबग सुरू झाली आहे. ही कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी नाका कामगारांची मागणी वाढल्याने खोपोलीत सध्या नाका कामगारांना सुगीचे दिवस आले आहेत. कमीतकमी पाचशे रुपये हजेरीप्रमाणे खोपोलीत नाका कामगार उपलब्ध होत आहेत.

महिला आक्रमक

खोपोली : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांना सोशल मीडियातून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्यानंतर राज्यातील राजकीय क्षेत्रात खळबळ माजली आहे.सदर आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू असताना खोपोली शहरात महिला शहर अध्यक्षा सुवर्णा मोरे यांच्या नेतृत्वाखाली खोपोली पोलिस ठाण्यात वरीष्ठ पोलिस निरिक्षक शिरीष पवार यांच्याकडे निवेदन देऊन आरोपीला कडक शासन करण्याची मागणी शासन दरबारी पोहचविण्याची विनंती केली आहे.

लाटांचा जोर वाढला

मुरुड- जंजिरा : मुरुड-खोरा बंदरातील समुद्र किनाऱ्यांवर लाटांचा जोर वाढला असुन जोराचे वारे वाहत आहेत.किनाऱ्यावर लाटांचा मारा होत आहे.तर अरबी समुद्रात मबीपर जॉयफ चक्रीवादळ तयार होत असल्याने कोकण किनारपट्टीला धोक्याचा इशारा दिला होता.चक्रीवादळाची दिशा बदलल्याने कोकण किनारपट्टीचा धोका टळला; मात्र उधाणाच्या मोठ्या भरतीमुळे तालुक्यातील सर्वच समुद्र किनाऱ्यांवर कालपासून समुद्राच्या मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या आहेत.

आरोग्य शिबीर

म्हसळा : नगरपंचायतीच्या वॉर्ड क्रमांक १३ मधील विद्यमान नगरसेविका राखी अजय करंबे यांच्या प्रयत्नातून ओम साई मेडिकल म्हसळा यांच्या विद्यमाने म्हसळा येथे मोफत आरोग्य आणि रक्त तपासणी शिबीर सुशील यादव यांचे निवासस्थानी (दि.११) रोजी संपन्न झाला. सदर शिबिरास डॉ. नीलम कदम, नंदकुमार शिर्के, राखी अजय करंबे, विलास यादव, गजानन चेंऊलकर, निकेश कोकचा, अजय करंबे, अशोक काते, सुशील यादव, आदी मान्यवर उपस्थित होते.

शार्लोट आटला माथेरानमध्ये पाणीटंचाई

। माथेरान । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळ माथेरानला पाणीपुरवठा करणारे ब्रिटिशकालीन शार्लोट तलाव अजूनही सफाईच्या प्रतीक्षेत आहे. गेली नऊ वर्षे सफाई न केल्यामुळे तलावात गाळ मोठ्या प्रमाणात साचला आहे. गेल्यावर्षी सफाई करणाऱ्यासाठी श्री सदस्यांचे हात तयार होते. मात्र, अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे या तलावाचे गाळ काढण्याचे काम राहिले. त्यामुळे यावर्षी तरी शार्लोट तलाव गाळमुक्त होणार का, असा प्रश्न स्थानिक विचारीत आहेत.

माथेरान या पर्यटनस्थळाचा शोध ब्रिटिशांनी लावला. त्यावेळी ब्रिटिशांनी भविष्याचा विचार करीत नियोजनबद्धपणे शार्लोट तलाव बांधला, तेव्हापासून या शार्लोट तलावाच्या पाण्याचा उपयोग माथेरानकरांना पिण्यासाठी होऊ लागला. तीन बाजूंनी उतार असल्यामुळे पावसाचे पाणी तीन दिशांनी वाहून या तलावात येते. हे पावसाचे पाणी तलावात वाहून येताना माती, झाडाझुडपांची लाकडे, पर्यटकांनी टाकलेल्या पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, खाऊचे रॅपर येतात व गाळरुपात तलावात साचून राहतात. ऑक्टोबरमध्ये हा तलाव तुडुंब भरल्यानंतर यातील पाणी मार्च महिन्यापर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राखीव ठेवले जाते. ऑक्टोबर ते फेब्रुवारीपर्यंत पाण्याचा उपसा नेरळ कुंभे येथून केला जातो. त्यामुळे पाऊस पडेपर्यंत या तलावात पाणीसाठा असतो.

नेरळ कुंभे येथून पाणी आले नाही तर शार्लोट तलावातील पाण्याचा उपसा होतो. त्यामुळे माथेरानमध्ये पाणीटंचाई भासत नाही. पण, गेल्या नऊ वर्षांत या तलावाची सफाई झाली नाही. २०१४ मध्ये नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून या तलावाची सफाई करण्यात आली होती. पण, २०१४ नंतर या तलावाकडे ना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लक्ष दिले, ना नगरपालिकेने, त्यामुळे नऊ वर्षांत तलावात गाळ मोठ्या प्रमाणात आला आहे. यावर्षी जर तलाव गाळमुक्त केला नाही, तर मात्र माथेरान शहराला पाणीटंचाई भासू शकते, अशी भीती स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि माथेरान नगरपालिका मिळून हा तलाव गाळमुक्त करावा, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

मागील २०२२ मध्ये शार्लोट तलाव गाळमुक्त करण्यासाठी पालिकेने जोरदार प्रयत्न केले. यासाठी धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत सकारात्मक प्रतिसादही मिळाला. तलाव स्वच्छतेसाठी सर्व साहित्यांची व्यवस्था पालिकेकडून केली गेली. मात्र, तलावातील पाणी सोडल्यामुळे त्या मार्गातील गावांना धोका होऊ नये यासाठी त्या गावांशी पालिका व एमजेपीच्या अधिकाऱ्यांनी संपर्क साधला नाही. त्यामुळे ही सगळी प्रक्रिया फक्त कागदावरच राहिली. त्यामुळे यावर्षी त्याची पुनरावृत्ती पुन्हा नको यासाठी सर्व प्रकारचे नाहरकत दाखले घेण्याचे नियोजन आत्तापासूनच करावे, अशी ही मागणी माथेरानवासीय करीत आहेत.

> शार्लोट तलावाची स्वच्छता होणे गरजेचे आहे. जितके जास्त पाणी साचेल, तितका पाण्याचा साठा वाढेल. पूर्वी दरवर्षी तलावातील गाळ काढला जात असे. तीच मानसिकता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी आणि माथेरान नगरपालिकेने दाखवायला हवी. एकमेकांच्या समन्वयाने हे काम तडीस जाऊ शकते.
> – जनार्दन पार्टे, सामाजिक कार्यकर्ते, माथेरान

> माथेरान नगरपालिकेने शार्लोट तलाव स्वच्छतेबाबत सर्व पत्रव्यवहार पूर्ण करुन परवानगी घ्यावी. तलाव स्वच्छतेसाठी आम्ही त्यांना पूर्ण सहकार्य करु.
> – व्ही.के. सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता, पनवेल

आदिवासी जमिनीवरील अतिक्रमण ग्रामपंचायतीने हटवले

। नेरळ । प्रतिनिधी ।

आदिवासी ठाकूर समाजाच्या राखीव जागेवरील अतिक्रमण ग्रामपंचायतीने हटविले आहे. त्या जमिनीवर आता नव्याने कर्जत तालुका आदिवासी ठाकूर समाज संघटनेचे कार्यालय सुरू केले जाणार असल्याचे नवनियुक्त अध्यक्ष परशुराम दरवडा यांनी जाहीर केले आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नंबर २७१ ही जमीन आदिवासी ठाकूर समाजाची राखीव असलेल्या जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले होते. अनेक वर्षे तेथे अतिक्रमण करून व्यवसाय केले जात होते आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या आदिवासी राखीव जागेचा विषय आदिवासी ठाकूर समाज संघटना कर्जत यांनी पुढे येऊन सोडवला.कर्जत कल्याण या राष्ट्रीय महामार्गावर नेरळ ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या सध्याच्या नेरळ पोलीस ठाण्याच्या पुढील सर्व्हे नंबर २७१ ही जमीन आदिवासी ठाकूर समाजासाठी राखीव आहे. परंतु, या जागेवर काही स्थानिकांनी जागा अडवून अतिक्रमण केले होते. परंतु, आदिवासी समाजाने याबाबत नेरळ ग्रामपंचायतीला वेळोवेळी जागेसंदर्भातील महत्त्वाचे कागदपत्रक दाखवून जागेवरील अतिक्रमण हटवण्याची मागणी लावून धरली होती.

दरम्यान, अध्यक्ष परशुराम दरवडा यांनी नेरळ ग्रामपंचायत कार्यालयाकडून अतिक्रमण हटवण्यासाठी येथील ग्रामस्थांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. दोन-अडीच महिने होऊनही या जागेवरचे अतिक्रमण हटवण्यात येथील रहिवासी तयार नव्हते. अखेर शनिवारी नेरळ पोलिसांच्या बंदोबस्तात ग्रामपंचायतीने धडक कारवाई करीत अतिक्रमण हटवून जागा मोकळी करून दिली. यावेळी आदिवासी समाज संघटनेच्या महिला तालुका अध्यक्ष जयवंती हिंदोळा, ममदापूर ग्रामपंचायत सरपंच दामा निरगुडे आदींसह अनेक जुने कार्यकर्ते उपस्थित होते.

दूरशेत गावाजवळ डंम्पर पलटी

। पाली वार्ताहर ।

पाली खोपोली राज्य महामार्गावर दूरशेत गावच्या हद्दीत साईटपट्टीवर डंपर पलटी होऊन अपघात झाला. ही घटना शनिवारी (ता.१०) घडली. वाकण पाली खोपोली राज्य महामार्गाच्या भुसभुशीत व निकृष्ट दर्जाच्या साईट पट्टीमुळे हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे.

हाडंपरखोपोलीवरूनपालीकडे जात होता. त्यावेळी साईटपट्टीवर आला असता भुसभुशीत मातीमुळे पलटी झाला. यामध्ये कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही. वाकण पाली खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. मात्र रस्त्याच्या साईडपट्टीचे काम पूर्ण होत नाही तर, लागलीच केबल नेटवर्किंगच्या कामासाठी साईट पट्टीचे खोदकाम केल्यामुळे अनेक ठिकाणी साईटपट्टी राहिली नाही आहे. शिवाय हे खड्डे बुजवून टाकण्यात आलेली माती भुसभुशीत आहे. तेथे शास्त्रशुद्ध मजबुतीकरण करण्यात आलेले नाही. परिणामी हा डंपर साईडपट्टी वर गेल्यावर लागलीच खचला आणि अपघात झाला आहे. या बाबत माध्यमांनी देखील काही दिवसांपूर्वी बातम्यांच्या माध्यमातून साईटपट्टीची वास्तव परिस्थिती मांडली होती. आणि लागलीच साईडपट्टीमुळे हा अपघात झाला. निकृष्ट व भुसभुशीत साईडपट्टीमुळे ऐन पावसाळ्यात वाहने खचून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. शिवाय वाहनांना मार्ग काढण्यास अडथळा येत असल्याने वारंवार वाहतूककोंडी देखील होत आहे.

> वाकण-पाली-खोपोली महामार्गाचे काम संथ गतीने व कमी दर्जाचे झाले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेली साईडपट्टी तरी किमान मजबूत व दर्जेदार हवी होती. मात्र तसे न झाल्याने अपघातांना निमंत्रण मिळत आहे. एमएसआरडीसी प्रशासनाने लागलीच याची दखल घेऊन ठेकेदाराकडून चांगल्या दर्जाचे काम करून घ्यावे.
> - रवींद्रनाथ ओव्हाळ, कोकण प्रदेश सदस्य, रिपाइं (आ.)

मजगांवच्या नाज एज्युकेशन ट्रस्ट शाळेचा विद्यार्थी, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस अजित कासार यांचा मुलगा कौस्तुभ याने दहावीमध्ये ८३ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्याचे कौतुक व अभिनंदन करुन शुभेच्छा देताना सामाजिक कार्यकर्ते सचिन कासेकर, मंगेश कांबळे, मंगेश पाटील आदी.
(छाया : राजीव नेवासेकर)

आपत्ती उपाययोजनेसाठी ग्रामस्थांची बैठक

। तळा । वार्ताहर ।

पावसाळ्यात आपत्ती रोखण्याच्या उपाययोजनेसाठी तळा प्रशासनाने नगरपंचायत हद्दीतील पुसाटी व जोगवाडी ग्रामस्थांची बैठक घेतली. तळा शहरातील पुसाटी व जोगवाडी ही दोन गावे तळगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेली असल्याने पावसाळ्यात या दोन्ही गावांना दरड कोसळण्याचा धोका असतो. गेल्या वर्षीच पावसाच्या सुरुवातीस तळगड किल्ल्यावरून दगड कोसळून जोगवाडी येथील घरांचे नुकसान झाले होते.यांसारखी घटना पुन्हा घडू नये यासाठी प्रशासनाने पुसाटी व जोगवाडी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन पावसाळ्यात काळजी घेण्याचे आवाहन केले.

पावसाळ्यात दरड कोसळण्यासारख्या घटना घडण्याची शक्यता असल्याने दरडीचा धोका असलेल्या घरातील नागरीकांनी सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे, आपत्ती काळात सावधगिरी बाळगून स्वतःसह इतरांचे संरक्षण करावे, आपत्ती काळात कोणतीही जीवितहानी होणार नाही याची काळजी घ्यावी. असे आवाहन केले. तसेच दरड कोसळण्याचा धोका असलेल्या नागरिकांना नोटीस बजावून सुरक्षितस्थळी हळण्याच्या सूचना दिल्या. याप्रसंगी तळा तहसीलदार स्वाती पाटील, मुख्याधिकारी माधुरी मडके, नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, ग्रीष्मा बामणे, मंगेश पोळेकर यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसिद्धीपासून दूर राहात विद्यार्थ्यांना सहकार्य करणारा अवलिया

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

कोणताही गाजावाजा न करता शालेय विद्यार्थ्यांना मनापासून सहकार्य करणाऱ्या काही व्यक्ती समाजात असतात. त्यापैकी एक म्हणजे महाड येथील मौर्य फोटो स्टुडिओचे मालक मंदार माने.

गेली सुमारे दहा वर्षे हिरडोशी हमरस्त्यावर करवंदे, आळू, जांभळे विकणाऱ्या मुलांना वह्या, पेन, पेन्सिली इ. शैक्षणिक साहित्य भेट देतात, अशी माहिती कोमसाप रायगडचे समन्वयक अ.वि. जंगम यांनी दिली.

श्री. माने हे विन्हेरे हायस्कूलचे चेअरमनही आहेत. हिरडोशी हायस्कूलमधील गरजू मुला-मुलींना ते वह्या, पुस्तके आदी शालोपयोगी वस्तू भेट देतात. १४ कि.मी. दूर शिरगावहून शिक्षणासाठी येणाऱ्या मुलांसाठी सुमारे ११ हजार रुपये किमतीचे शैक्षणिक साहित्यही त्यांनी भेट दिले आहे.

क्लिक

मुरूड खोराबंदरात आजही जंजिरा किल्ल्यासमोर लाटांचे तांडव सुरू होते. रविवारच्या सुट्टीसाठी आलेल्या पर्यटकांना लाटांचा थरार अनुभवायला मिळाला.
(छायाचित्रः सुधीर नाझरे)

वाढदिवसानिमित्त शालोपयोगी साहित्य वाटप

उरण : उरणमधील सामाजिक कार्यकर्ते दिलीप साळुंके यांचे सुपुत्र सात्विक साळुंके याच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त तालुक्यातील पुनाडे धरण वाडीवरील २० शाळकरी मुलांना कपडे, खाऊ व शालोपयोगी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी शिक्षक दिलीप म्हात्रे, रुपाली फडतरे, दिलीप साळुंके, सिंधू साळुंके, सात्विक साळुंके व इतर मान्यवर उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवसानिमित्त दिलीप साळुंके यांनी मुलाच्या वाढदिवसानिमित्त गोरगरिबांना शिक्षणासाठी मदत केल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- घरकामासाठी रहिवासी स्वरूपाची चांगणे जेवण बनवणारी बाई हवी आहे. ९४२१९५४३४८– (१०,०००)
- लग्न मुहूर्ताला येणाऱ्या पाहुण्यांसाठी, ग्रुप बुकिंगवर, हॉटेल रुम देणे आहे. भेटा नवीन हॉटेल 'द बनयन शेल्टर्स' चोंढी, मांडवा रोड. ९८५०४२७७२८, ९८२२२५७९२९
- PICK UP/407 टेम्पोवर अनुभवी २ ड्रायव्हर मांडवा येथे हवे आहेत. १५०००/– ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- अलिबागमध्ये ऑफिस कामाकरीता मुलगा पाहिजे १० वी पास. पगार ५०००–७००० मो.९९२३२३५०५६/९८२२४६१७६१
- वायशेत येथे रोडटच दुकान गाळे भाड्याने देणे आहेत. एच पी गॅस कं. उसर च्या पुढे २० गुंठे शेतजमिन विकणे आहे. ९४२११७०३५७
- चोंढी–किहीम शेडटच दोन गुंठे जागेमधील ४ गाळे व घर (एकत्र) विकणे आहे. ७८७५५२२८८८, ९८५००६३३२६
- अलिबाग एस.टी.स्टँडजवळ तळमजल्यावरील व्यापारी गाळा विकणे आहे किंवा भाड्याने देणे आहे. टॉयलेट, बाथरूम अॅटॅच्ड आहे. क्षेत्र ३०० चौ. फूट, संपर्क – प्रो लोन सोल्युशन ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३.
- Tuitions/classes for kindergarden to Std 5th (CBSE+ICSE), 'Home tuitions' available - 8308776924
- Vacancy for office staff for office in Alibag Graduate candidates can apply. For interview call 9923750549
- महान डेपो–रामराज येथे वाडीत काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. संपर्क – ९८२२००१८५३
- मशिनरीच्या दुकानात प्लंबर, मेकॅनिक, वायरमन व हेल्पर पाहिजेत. संपर्क– मारूती नाका, अलिबाग, ९८२२००१८५३
- अलिबागमध्ये लेडीज पार्लर कामासाठी अनुभवी मुली पाहिजेत वेळ ११ ते ८ मो. ८१४९८६५६२५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रायगडावर स्वच्छता मोहीम

। पाली । वार्ताहर ।

किल्ले रायगडावर १ जून ते ६ जून या कालावधीत ३५० वा शिवराज्याभिषेकदिन सोहळा लाखो शिवप्रेमींच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता. मात्र सोहळ्यानंतर गडावर सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पसरले होते. पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकच्या पिशव्या, तुटलेल्या चपला, जेवणाच्या डिश व प्लेटचा खच सर्वत्र पडला होता. किल्ल्यावरील परिसर स्वच्छ करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील आणि पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत स्वयंसेवी संस्था व दुर्गप्रेमींनी एकत्र येत रायगडावर स्वच्छता मोहीम राबवली.

अलिबागमधील सुरभी स्वयंसेवी संस्था, रायगड रक्षित सामाजिक संस्था-म्हसळा, अनुभव प्रतिष्ठान-खोपोली, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट-पेण, शिवाजी विद्यापीठ- कोल्हापूर येथून एनएसएसचे २०० विद्यार्थी, संस्थांच्या प्रतिनिधी व स्वयंसेवकांमार्फत किल्ल्यावरील नाणे दरवाजा, चित्त दरवाजा, माथा ते पाचाड पायथा परिसरात स्वच्छता व साफसफाई करण्यात आली.

रायगडावर येणाऱ्या शिवप्रेमींना परिसरात कचरा करू नये व पाण्याच्या बाटल्या इतरत्र टाकू नये, असे वारंवार आवाहन करण्यात येत होते. परंतु या आवाहनाला न झुमानता अनेकांनी कचऱ्याचे ढीग करून ठेवले होते. तर सोहळा संपल्यावर काही शिवप्रेमींनी स्वयंस्फूर्तीने खालून मोकळ्या गोण्या नेत कचरा गोळा करण्यास सुरुवात केल्याचे आढळले.

स्वच्छतेसाठी नियम ठरवणार

पुढच्या वर्षी जो शिवप्रेमी गडावर येईल त्याच्या आधार किंवा पॅन कार्डची पडताळणी केली जाईल. सोहळ्यात दाखल होण्यापूर्वी नियम, अटी शर्थींबाबत सूचना केल्या जातील. आणि त्यांचे पालन न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

दूषित पाणीपुरवठ्याने नागरिक हैराण

नागरिकांमधून नाराजी व्यक्त

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

मोरबे धरणातून पाणीपुरवठा होणारी मुख्य जलवाहिनी शनिवारी आदई गावाजवळ फुटल्याने तातडीने काम करण्यात आले. मात्र यादरम्यान शनिवारी सायंकाळी नवी मुंबई शहरातील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. तर रविवारी सकाळी नेहमीप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात आला, मात्र एकदम लालसर, गडुळ अस्वच्छ पाणी आल्याने नागरिकांमधून

नाराजी व्यक्त होत आहे.

नवी मुंबई शहरातील नागरिकांना मोरबे धरणातून पाणीपुरवठा होत असतो. याठिकाणी जलशुद्धीकरण केंद्र तसेच शहरातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा होण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जातात. मात्र तरीही शहरात सातत्याने अस्वच्छ पाणीपुरवठा होतच असतो. बुधवारी शहरात शटडाऊनमुळे पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे गुरुवारी कमी दाबाने पाणी आले. परंतु तिसऱ्या दिवशी पुन्हा शनिवारी आदई गावाजवळ मुख्य जलवाहिनी फुटल्याने तातडीने काम करण्यासाठी सायंकाळी शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. रविवारी सकाळी नळाला एकदम लालसर मातीचे पाणी आल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त करीत अस्वच्छ पाणीपुरवठा का करता? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

विद्यार्थ्यांची पाठीवरील ओझ्यातून सुटका

। पनवेल । वार्ताहर ।

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी एकात्मिक आणि द्विभाषिक पुस्तकांमध्ये बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना वापराव्या लागणाऱ्या वह्यांचे ओझे कमी होणार असून पुस्तकांमध्येच वह्यांची पाने जोडली गेल्याने शाळेत वही नेण्याची गरज भासणार नसल्यामुळे पाठीवरील ओझे कमी होऊन विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

स्पर्धात्मक युगामुळे शालेय अभ्यासक्रमात वारंवार बदल होत आहेत. याशिवाय शाळांमध्ये दररोज विविध उपक्रम राबवले जातात. त्यामुळे पाठ्यपुस्तकांसोबत इतर अभ्यासक्रमांची पुस्तके, वह्या, कंपासपेटी, जेवणाचा डबा व पाण्याची बाटली या वस्तूंमुळे विद्यार्थ्यांचे दप्तर भरलेले असते. या दप्तरामुळे अनेकांना पाठ तसेच मानदुखीसारखे गंभीर आजार लहानपणीच बळावत आहेत. याबाबतची माहिती एका सर्वेक्षणातून समोर आल्यानंतर शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी राज्य शासनाने नवा आदेश काढला आहे. त्यानुसार पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाकडून देण्यात येणाऱ्या पुस्तकातील धड्यातील मजकुरानुसार दोन ते चार पाने जोडली आहेत. त्यामुळे शाळेत स्वतंत्र वही नेण्याची गरज नसल्यामुळे पाठीवरील ओझे कमी होणार आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

माझी वसुंधरा अभियानात महाड अव्वल

। महाड । वार्ताहर ।

माझी वसुंधरा अभियानांतर्गत महाड नगरपरिषदेने उत्तम कामगिरी केली असून कोकण विभागात अव्वल क्रमांक मिळवला आहे. अभियानात महाड नगर परिषदेने दीड कोटी रुपये बक्षीस पटकावले आहे.

माझी वसुंधरा अभियान ३ अंतर्गत उच्चतम कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा निकाल पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्यामार्फत ५ जूनला जाहीर करण्यात आला. यात कामाचे डेस्कटॉप मूल्यमापन व फिल्ड मूल्यमापन करण्यात आले. यामध्ये २५ हजार ते ५० हजार लोकसंख्या असणाऱ्या नगरपरिषदेच्या गटामध्ये कोकण विभागामध्ये महाड नगरपरिषदेने पहिला क्रमांक प्राप्त केला.

निसर्गाच्या पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश पंचतत्वासोबत जीवनपद्धती अंगिकारल्याशिवाय आपण जगू शकणार नाही आणि जैवविविधतेचेही अस्तित्व राहणार नाही. म्हणून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सोबत घेऊन निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करून शाश्वत, निसर्गपूरक जीवनपद्धती अवलंबण्यासाठी 'माझी वसुंधरा' हे अभियान राज्य सरकारच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून राबवण्यात येत आहे. अभियानांतर्गत नागरी स्थानिक संस्था व ग्रामपंचायती या स्थानिक संस्थांची पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या योजना प्रभावीपणे व मिशन मोड पद्धतीने राबवण्याची स्पर्धा घेण्यात येते.

स्थानिक संस्थांनी एप्रिल ते मार्च या कालावधीत केलेल्या कामाची माहिती एम. आय. एस. स्वरूपात अभियानाच्या वेब पोर्टलवर भरावी लागते. स्थानिक संस्थांनी भरलेल्या माहितीचे त्रयस्त यंत्रणेमार्फत डेस्कटॉप मूल्यमापन करण्यात येते.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

शासन आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत

वाशी हवेली येथे कार्यक्रमाचे आयोजन

। तळा । वार्ताहर ।

शासन आपल्या दारी या उपक्रमाची संपुर्ण राज्यात अंमलबजावणी करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून उपविभागीय अधिकारी माणगाव यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय तळाचे वतीने मौजे वाशी हवेली ग्रामपंचायतीत शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याउपक्रमांतर्गत नवीन उत्पन्न दाखले, संजय गांधी निराधार पेन्शन योजनेचे लाभार्थी, शिधा पत्रिका नाव कमी करणे व नवीन मतदार नोंदणी तसेच पी एम किसान के वाय सी करणे अशा विविध योजनांची लाभार्थी शोधून त्यांचे फॉर्म भरण्यात आले. या उपक्रमामुळे नागरिकांची कामे जलद गतीने वेळ खर्च न होता व्हावी

हा या मागचा उद्देश असून शासनातर्फे सदर कार्यक्रम स्थानिक स्तरावर राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाप्रसंगी जगन्नाथ तांडेल, समीरा खाडे, नेहा तांबडे, अनिकेत पाटील यांसह वाशी हवेली ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिल अफझल नूर मोहम्मद खान यांनी मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालीलप्रमाणे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन : मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.चौ.मी.)	आकार (रु.पै.)
कल्पना कमलेश कोटक	९	१२	०-०७-००	०-०६
	९	१३	०-२०-००	०-१९
	९	१५/अ	०-१०-००	०-०७
	१०	१	०-१८-२०	२-३१

वरील मिळकती ह्या आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. ५/०६/२०२३
ॲड. निलेश रखमाजी पादीर
मो. ९७६७६३७१००/९२७२५६२१५८

ॲड. दिपक रखमाजी पादीर
मु.पो. नेरळ (मोहाचीवाडी)
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९८५०७६७५६८

Anjuman Islam Janjira

A.I.G Convent High School & Jr. College
Mandla, Tal. Murud Janjira, Dist. Raigad
Walk in interview for Principal & Assistant teacher
Academic year 2023-24
For following Unaided posts

Sr. No.	Qualification Required	No. of Posts
1.	H.Sc. D.Ed	05
2.	B.Sc/B.A/M.A B.Ed	04
3.	Physics (M.Sc B.Ed)	01
4.	Chemistry (M.Sc B.Ed)	01
5.	Biology (M.Sc B.Ed)	01
6.	Mathematics (M.Sc B.Ed)	01

The candidate willing to apply may send their resume along with applications on college mailid/following address by post on or before 4.00 pm till 13th June 2023.
Date of Interview: - 14th June 2023. Time: - 03.00 pm
College Mail id:- aijheadoffice1907@gmail.com
Address of School: - Anjuman Islam Janjira A.I.G Convent High School & Jr. College campus, Mandla, Tal. Murud
Janjira Dist. Raigad

माणगाव विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके

। माणगाव । वार्ताहर ।

शासनाच्या समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता मोफत पाठ्यपुस्तके माणगाव तालुक्यातील विद्यार्थांना शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत मिळणार असून माणगाव तालुक्यात ३१६ सर्व जिल्हापरिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक, खासगी अनुदानित व शासकीय आश्रम शाळामधील विद्यार्थांना या पाठ्यपुस्तक योजनेचा लाभ मिळणार असून तालुक्यातील १२६४० विद्यार्थांना यांचा मोफत लाभ मिळणार आहे. माणगाव तालुक्यासाठी शासनाकडून ५२२०५ एवढी

पुस्तके प्राप्त झाली आहेत.

समग्र शिक्षा अंतर्गत पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शासनामार्फत यंदाचे वर्षीही मोफत पाठ्यपुस्तके वितरीत करण्याची प्रक्रिया ९ जून पासून सुरु झाली आहे. शासनाने विद्यार्थांच्या पाठीवरील ओझे कमी करण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले असून प्रत्येक विद्यार्थांला चार भागाची पुस्तके मिळणार आहेत. ही पुस्तके संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत शाळा, विद्यालयांना मिळणार आहेत. त्या शाळांकडून शाळेचा पहिला दिवस १५ जून रोजी विद्यार्थांना मोफत मिळणार आहेत. विदयार्थ्यांना मोफत पुस्तके दिली जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी, पालकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

रसायनीत पेंढ्याला चांगला भाव

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी परिसरात दुबार भातकापणीनंतर पेंढ्याला खूपच मागणी वाढली आहे. भाव चांगला मिळत असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करत आहे. दरम्यान, परिसरातील दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांना जास्त भावाने वैरण खरेदी करावी लागत असल्याने ते हताश झाले आहे. रसायनी परिसरातील वडगाव, वासांबे मोहोपाडा, आपटे, चावणे, पंचक्रोशीतील शेतकरी पावसाळी खरिपाच्या हंगामात भाताचे पीक घेत आहे.

मात्र परतीच्या पावसामुळे कापणीला आलेल्या भातपिकाचे नुकसान झाले होते. तर काहींचे पीक कुजून गेले. त्यात बाहेरगावच्या दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांकडून वैरणीला मागणी वाढत गेली.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकती त्यांच्या मालकांकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मौजे- सावळे, तालुका- कर्जत, जि.- रायगड येथील जमीन मिळकती

मालकाचे नाव	सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
रघुनाथ गोविंद धुळे	१	२	०-१८-००	०-१६
रघुनाथ गोविंद धुळे	१	३/अ	०-०४-३०	०-४४
रघुनाथ गोविंद धुळे	१	४	०-१५-००	०-१२
रघुनाथ गोविंद धुळे	४	३	०-२७-००	०-३३

सदरच्या जमीनमिळकती ह्यावरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती ह्या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १२/०६/२०२३

खरेदीदारातर्फे वकील
ॲड. स्वप्निल बाबूराव देशमुख
पत्ता : मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४
डी विंग, मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मुनवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत, जमिनीचे विद्यमान मालक यांसकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतींचे वर्णन

गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार रु.पै.	विद्यमान मालकाचे नाव
३१/२	०-३६-९० पो.ख. ०-०७-७० एकूण ०-४४-६० पैकी एम.आय.डी.सी. रोड लगत जमिनीचे क्षेत्र वगळून ०-२२-० हे.आर. एवढी जमीन मिळकत	८.३१	अशोक महादेव मसुरकर

वरील वर्णनाची जमीन मिळकत ही निर्वेध असल्याचा निर्वाळा त्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांनी दिला असून गावचे गाव नमुना नं. सातबारापत्रकी ही त्यांचे नावे मालक म्हणून दाखल आहे. तरीही सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत वरील मिळकतीबाबत कुणाचाही विक्री, दान, गहाण, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारस हक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्याबद्दलची लेखी हरकत, संबंधितांनी खाली सही करणार यांचेकडे योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित द्यावी. विहित मुदतीत लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध आहेत असे गृहीत धरुन सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०६/२०२३
अलिबाग

ॲड. मसीर अ. घोले
१७, अलिबाग कमर्शियल कॉम्प्लेक्स,
बँक ऑफ बरोडा समोर,
अलिबाग ४०२२०१

अवकाळीमुळे डाळींची आवक घटली

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई कृषी उत्पन्न धान्य बाजार समितीत अवकाळी पावसाने डाळींची आवक घटल्याने डाळींची दरवाढ झालेली आहे. गुजरात आणि महाराष्ट्रातुन दाखल होणाऱ्या डाळींच्या उत्पादनाला पावसाचा फटका बसला आहे. त्यामुळे एपीएमसीत आवक घटली परिणामी एपीएमसीत तूरडाळ, उडीद डाळिंची शंभरी पार तर मुगडाळीच्या दरात ३ टक्के दरवाढ झाली आहे.

अवकाळी पाऊस आणि कडक उन्हाने डाळींच्या उत्पादनाला फटका बसला आहे त्यामुळे बाजारात डाळींची आवाक कमी होत असून दरात वाढ होत आहे. या आठवड्यात चणाडाळ तूरडाळ आणि मूग डाळीचे दर दोन ते तीन टक्क्यांनी वाढले आहेत. पुढील कालावधीत ही डाळींचे दर चढेच राहतील असे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे. वाशीच्या मुंबई कृषी उत्पन्न धान्य बाजार समितीत यंदा अवकाळी पाऊस आणि उष्ण वातावरणाने कडधान्य उत्पादनात घट झाली असून आवक कमी होत असल्याने दरात वाढ झाली असल्याचे मत घाऊक व्यापरी करीत आहेत.

एपीएमसी बाजारात महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेश येथून डाळी दाखल होतात, परंतु राज्यातून आणि गुजरात मधून मोठ्या प्रमाणावर उत्पादनाला फटका बसला आहे, तसेच डाळिंची आयात देखील होत नाही. त्यामुळे बाजारात डाळींची डाळींची आवक होते. मात्र पावसामुळे आवक घटली आहे. फेब्रुवारीपासून डाळींची दरवाढ होण्यास सुरुवात झाली असून आता पुन्हा डाळींचे दर कडाडले आहेत.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळवण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक श्री. राजेश अनंत पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले असून त्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये बोलणी सुरु आहेत.

मिळकतींचे वर्णन की,

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील आणि अलिबाग नगरपरिषद यांचे अधिकार कक्षेतील मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ९५१ ए, ९५१ बी व के-९५१ या मिळकतीवर उभारण्यात आलेल्या सुभेदार को.ऑप.हौ. सोसायटी मर्या. अलिबाग या इमारतीमधील तळ मजल्यावरील दुकान गाळा क्र. १३ क्षेत्र १८६ चौ. फुट (अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000001717) ही मिळकत.

सदरहू मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमूद मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबत भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहू मिळकतीबाबत आमचे अशिल विद्यमान मालकांबरोबर वर नमूद मिळकतीबाबत खरेदी व्यवहार करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १०.०६.२०२३

श्री. अमित महेश्वर देशमुख
ॲडव्होकेट आणि नोटरी
सृष्टी बिल्डींग वेधशाळेसमोर
मु.पो. अलिबाग-रायगड

REG. No. : RGD/ABG/RSR(CR) 361/2002
DATTA PATIL URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD.
Patil Naka, Alibag, Dist Raigad 402201. Mob-8237225514/8805697682 e-mail : dpuc@yamail.com

वार्षिक सर्वसाधारण सभा
(फक्त सभासदांसाठी)

दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेडची वार्षिक सर्वसाधारण सभा मे. चेअरमन साहेब यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक-२८/०६/२०२३ रोजी सकाळी १०-३० वाजता दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड अलिबाग येथील कार्यालयात भरणार आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

-: सभेपुढील कामे :-

१) मागील दि. ०७/०९/२०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व मान्यता देणे.
२) सन २०२२-२०२३ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकावर चर्चा करणे व स्विकृत करणे.
३) कायदा व नियम यास अनुसरुन संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२२-२३ चा वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरीक्षण अहवाल स्विकारणे व सन २०२१- २२ च्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
५) सन २०२३-२४ सालाकरीता लेखापरिक्षरकांचा लेखापरीक्षण कामी नेमणुक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे.
६) पुढील वर्ष सन २०२३-२४ सालाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

अलिबाग
दिनांक : १०/०६/२०२३

आपला विश्वासू
सही/-
श्री. प्रमोद दत्तात्रेय पाटील
(चेअरमन)

टिप : सदर सभा कोरम अभावी तहकूब झाल्यास ती त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. या सभेस कोरमची आवश्यकता लागणार नाही.

PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY'S, ARTS, COMMERCE & SCIENCE Sr. COLLEGE. VESHVI-ALIBAG – 402 201.

(Permanently Un-aided)
WALK-IN-INTERVIEW

VENUE : P.N.P. Education Society. Central Office. Veshvi – Alibag. Alibag-Panvel High Way.
DATE : 23th June 2023
TIME : 11:00 A.M.
Contact : 8380055635

Senior College

Sr. No.	Subject	Cadre	Qualifications	Total No. of Posts
1	History	Asst.Prof	M.A;NET./SET./PhD.	1
2	Economics	Asst. Prof	M.A;NET./SET./PhD.	1
3	English	Asst. Prof	M.A;NET./SET./PhD.	1
4	Geography	Asst. Prof	M.A;NET./SET./PhD.	1
5	Physics	Asst. Prof	M.Sc;NET./SET./PhD.	1
6	Mathematics	Asst.Prof	M.Sc;NET./SET./PhD.	1
7	Zoology	Asst. Prof	M.Sc; NET/SET./PhD.	1
8	Computer	Asst.Prof	M.Sc; MCA/B.E./M.C.M	3
			Total	11

The eligible and desirous candidates should application with Resume on submit it on the date of the interview along with attested Xerox copies of the testimonials.

The candidates are requested to prepare a demo lesson of their own subject.

Sd/
SECRETARY.
(Mrs. Chitralekha N. Patil)

निवडक

राहुल द्रविडवर टीकास्त्र

नवी दिल्ली : विश्व कसोटी अजिंक्यपद सामन्यातील भारतीय खेळाडूंच्या कामगिरीवरुन प्रशिक्षक राहुल द्रविडवर आता क्रीडाविश्वातून टीकास्त्र होऊ लागले आहे. पाकिस्तानचे माजी खेळाडू बासित अली यांनी देव अक्कल वाटत असताना राहुल द्रविड कुठे डोंगरामागे लपला होते. प्रशिक्षक म्हणून झिरो आहेत. द्रविड दिग्गज आहे. मात्र, कोच म्हणून झिरो आहेत, अशी घणघाती टीका बासिल अली यांनी द्रविडवर केली आहे.

इगा स्विअतेक अजिंक्य

पॅरिस : पोलंडच्या इगा स्विअतेकने चेक प्रजासत्ताकच्या कारोलिना मुचोवाचा पराभव करून तिसऱ्यांदा फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचे अजिंक्यपद इगाने संपूर्ण स्पर्धेत एकही सेट गमावला नव्हता. सलग चार गेम जिंकत मुचोवाने दुसरा सेट जिंकत सामन्यात रंग भरले. कसलेल्या इगाने वेळीच सावरले आणि तिसऱ्या व निर्णायक सेटमध्ये आपले प्रभुत्व सिद्ध केले. हे तिचे चौथे ग्रँडस्लॅम अजिंक्यपद आहे.

रवी शास्त्रींचा संताप

मुंबई : भारताच्या सलामीच्या ४ खेळाडूंपैकी २ खेळाडू हे आयपीएलच्या १६ व्या पर्वामध्ये सर्वाधिक धावा करणारे खेळाडू आहेत. असं असूनही त्यांना विश्व कसोटी अजिंक्यपदच्या अंतिम सामन्यात चांगली कामगिरी करता आली नसल्याबद्दल माजी क्रिकेटर रवी शास्त्री यांनी संताप व्यक्त केला आहे. देशासाठी की आयपीएल खेळायचं आहे हे क्रिकेटपटूंनी ठरवून घेतलं पाहिजे असं रोखठोक मत रवी शास्त्रींनी व्यक्त केलं आहे.

भरत पाटील अध्यक्ष

पनवेल : रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेता वेल्फेअर असोसिएशन पनवेलच्या अध्यक्षपदी भरत पाटील यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणीमध्ये मनिषा गाथाडे, मनिषा घरत, सुरेखा थोरले, अनिता खुटले,अदिती अरूण म्हात्रे, स्वप्नाली उमेश परदेशी,कृष्णा महादेव भेंडे, गुरूनाथ भाऊ गडगे, राकेश नंदकुमार ठाकरे, विनायक गुरूनाथ जगे, मधूकर बाबु गरुडे यांची निवड करण्यात आली.

राम डांगे यांना मारहाण

पोलादपूर : रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी कार्यकारी संचालक राम डांगे यांना जुन्या वादातून अचानक मारहाण झाली. या मारहाणीत डांगे यांची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्यांना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर आमदार भरत गोगावले यांनी त्यांची रुग्णालयात भेट घेऊन चौकशी केली. याप्रसंगी चंद्रकांत कळंबे, अहिरे, लक्ष्मण मोरे तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कुस्तीपटूंच्या आंदोलनाची दखल

पोलिसांकडून कारवाई सुरु; व्हीडीओ, पुरावे सादर करण्याचे निर्देश

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजप खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात दोन महिला कुस्तीपटूंनी केलेल्या आरोपांची शहानिशा आता दिल्ली पोलिसांनी सुरु केली आहे. ज्यांनी आरोप केलेले आहेत अशा कबड्डीपटूंकडून व्हीडीओसह आवश्यक ते पुरावे सादर करण्याचे निर्देश दिल्ली पोलिसांनी दिले आहेत.

याप्रकरणी चार महिने न्यायासाठी कुस्तीपटू जंतर-मंतरवर तळ ठोकून होते. त्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेत १५ जूनपर्यंत आंदोलनाला स्थगिती दिली. अशातच साक्षी मलिकसह बजरंग पुनियाने सरकारला निर्वाणीचा इशारा दिला होता याची दखल आता केंद्र सरकारनेही घेतली आहे. दिल्ली पोलिसांनी तपास सुरू केला आहे. पोलिसांनी पुरावा म्हणून फोटो, ऑडिओ आणि व्हिडिओ देण्यास सांगितले आहे. ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या विरोधात दाखल केलेल्या एफआयआरनुसार, लैंगिक छळाच्या या घटना २०१६ ते २०१९ दरम्यान नवी दिल्ली तसेच परदेशातील स्पर्धांदरम्यान घडल्या आहेत.

, ५ जून रोजी सीआरपीसीच्या कलम ९१ अंतर्गत महिला कुस्तीपटूंना स्वतंत्र नोटीस बजावण्यात आली होती आणि त्यांना उत्तर देण्यासाठी एक दिवसाची वेळ देण्यात आली होती. 'आम्ही आमच्याकडे जे काही पुरावे आहेत ते दिले आहेत. आमच्या एका नातेवाईकानेही पोलिसांना जे मागितले ते दिले असल्याचे एका महिला कबड्डीपटूने सांगितले.'

क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर कुस्तीपटूंनी आंदोलन स्थगित केले होते. १५ जून रोजी दिल्ली पोलीस या प्रकरणी आरोपपत्र दाखल करणार आहेत. पोलिसांनी तक्रारकर्त्यांना कथित घटनांची तारीख आणि वेळ, कार्यालयात घालवलेला वेळ आणि त्यांच्या रूममेट आणि इतर संभाव्य साक्षीदारांची नावे सादर करण्यास सांगितले आहे. डब्ल्यूएफआय कार्यालयात जाताना कुस्तीपटू ज्या हॉटेलमध्ये थांबले होते, त्या हॉटेलचा तपशीलही पोलिसांनी मागवला आहे.

आशिया चषकचा मार्ग मोकळा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आशियाई क्रिकेट परिषदेने आशिया कप २०२३ साठी पाकिस्तानचे संकरित मॉडेल स्वीकारले आहे. त्यानुसार या स्पर्धेचे सामने पाकिस्तानमध्ये होणार आहेत. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांच्या नेतृत्वाखालील आशियाई क्रिकेट परिषद आशिया चषक स्पर्धे साठी पीसीबीच्या संकरित मॉडेलला मान्यता देण्याची शक्यता आहे. या स्थितीत पाकिस्तानसह इतर संघ पाकिस्तानमध्ये आपले सामने खेळतील. त्याचवेळी, भारतीय संघाचे सामने श्रीलंकेतील गाले आणि पल्लेकेले मैदानावर खेळवले जातील. यासह पीसीबीने भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी आपला संघ पाठवण्यास सहमती दर्शवली आहे. म्हणजेच दीर्घकाळ चाललेल्या या वादानंतर आता चित्र स्पष्ट होताना दिसत आहे.

मंगळवारी आशिया चषक आयोजित करण्याबाबत औपचारिक घोषणा करू शकते. हायब्रीड मॉडेलच्या अधिकृत स्वीकृतीमुळे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषकासाठी पाकिस्तान संघाला भारतात जाण्याचा मार्ग मोकळा होईल. पाकिस्तानचा संघ अहमदाबादमध्येही खेळण्यासाठी सज्ज आहे. एसीसी कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना आशिया चषक स्पर्धेच्या यजमानपदाशी संबंधित समस्या सोडविण्याची जबाबदारी देण्यात आली होती. या सदस्यांमध्ये ओमान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख पंकज खिमजी यांचाही समावेश होता. बहुतेक देशांना हायब्रीड मॉडेल नको होते. मात्र, आतापर्यंत लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर चार सामने होणार असून, त्यात भारतीय संघ खेळणार नाही. हे सामने आहेत- पाकिस्तान विरुद्ध नेपाळ, बांगलादेश विरुद्ध अफगाणिस्तान, अफगाणिस्तान विरुद्ध श्रीलंका आणि श्रीलंका विरुद्ध बांगलादेश. आयसीसीचे सीईओ ज्योफ अल्लार्डिस आणि चेअरमन ग्रेग बार्कले पीसीबी चेअरमन नजम सेठी यांची भेट घेण्यासाठी कराचीला गेले, भारतात होणाऱ्या विश्वचषकमध्ये खेळण्यासाठी पाकिस्तानने कोणतीही अट ठेवणार नाही, असा निर्णय घेतला.

भारतीय महिला हॉकी विश्वचषकासाठी पात्र

। काकामिगारा । वृत्तसंस्था ।

सुनेलिता तोप्पो हिने केलेल्या एकमेव आणि निर्णायक गोलमुळे भारताने कनिष्ठ महिला आशिया कप स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले, त्याचबरोबर कनिष्ठ महिलांच्या विश्वकरंडक स्पर्धेसाठीही पात्रता मिळवली. सुनेलिताच्या गोलाने भारताने उपांत्य सामन्यात जपानचा १-० असा पराभव केला.

कनिष्ठ गटाची विश्वकरंडक स्पर्धा सँतियागो येथे २९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत होत आहे. या आशिया कप स्पर्धेत पहिले तीन क्रमांक मिळवणारे देश कनिष्ठ विश्वकरंडक स्पर्धेसाठी थेट पात्र ठरणार आहेत. पिछाडीनंतर भारतीय महिलांचा विजय; मलेशियावर २-१ अशी मात

कनिष्ठ आशिया कप स्पर्धेत भारताने २०१२ नंतर दुसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली आहे. यजमान जपानविरुद्धच्या सामन्यात पहिल्या तीन सत्रांत एकही गोल झाला नव्हता. बरोबरीची ही कोंडी सुनेलिताने ४७ व्या मिनिटाला फोडली. तिने केलेला गोल सामन्यातला एकमेव आणि निर्णायक गोल ठरला. आता उद्या रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताचा विजेतेपदाचा मुकाबला कोरियाविरुद्ध होईल.

भारत आणि जपान यांच्यातील हा सामना कमालीचा चुरशीचा झाला. दोन्ही संघांतील खेळाडू एकमेकांना एक इंचही देत नव्हते इतका संघर्ष झाला. सुनेलिताला मात्र थोडीशी संधी मिळाली आणि त्याचे तिने सोने केले. सामन्यात जोरदार संघर्ष झाला तरी गोल करण्याच्या तेवढ्याच संधीही मिळाल्या होत्या. दोघांनाही प्रत्येकी १२ पेनल्टी कॉर्नर मिळाले; परंतु त्यावर एकही गोल झाला नाही.

या स्पर्धेत प्रभावी खेळ करत असलेल्या भारताने सुरुवात जोरदार आक्रमक खेळाने केली. चेंडूचा ताबा आपल्याकडेच राखत गोल करण्याच्या काही संधी मिळवल्या होत्या. त्यानंतर संधी मिळताच जपानेही भारतीय गोलक्षेत्रात आक्रमण केले होते.

आवास येथे संगीत भजन मैफिल

। आवास । वार्ताहर ।

भगत आळी, आवास येथे ग्रुप ग्रामपंचायत आवासचे माजी सरपंच स्वर्गीय मनोहर विनायक भगत (आप्पा) यांचा तृतीय पुण्यस्मरणदिनी त्यांच्या निवासस्थानी भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी सुश्राव्य भजन मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते.

सर्व प्रथम स्व. मनोहर भगत (आप्पा) यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भजन मैफिलीस प्रारंभ करण्यात आला. या संगीत भजन मैफिलीमध्ये गणेशबुवा बंडा, उरण व शंकरबुवा गिरी, जालना या दोन गायकांचे सुमधुर गायन झाले. पखवाज साथ मधुकरबुवा धोंगडे, पनवेल यांनी केली. तबला साथ ज्ञानदीपबुवा बंडा, उरण यांनी केली. निवेदन धनंजय भगत, आवास यांनी केले. सर्व कलाकारांनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या मैफिलीचे आयोजन जगदीश भगत, प्रमोद भगत, यशवंत भगत यांच्या वतीने करण्यात आले होते. भगत यांच्या कुटुंबीयांनी संगीत भजन मैफिलीतील

सर्व कलावंतांचे व उपस्थित मान्यवरांचे यथोचित स्वागत केले. या कार्यक्रमासाठी पं.स. माजी सदस्य रणजीत राणे, बोरीस माजी सरपंच महेश पडते, ॲड. प्रसाद पाटील, संगीतप्रेमी प्रमोद पाटील, जगदीश पाटील, गजानन पाटील, रवींद्र वाघमारे तसेच इतर मान्यवर, परिसरातील ग्रामस्थ व रसिक श्रोते मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

लायन्स क्लब पदाधिकारी प्रशिक्षण उत्साहात



। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड आणि नवी मुंबई परिसरातील लायन्स क्लब ३२३१-४चे प्रशिक्षण खोपोली इमॅजिका किंगडम खालापूर येथील नोव्हाटेल हॉटेलच्या भव्य सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षणात रायगड आणि नवी मुंबईतील पन्नासहून अधिक लायन्स क्लबचे अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार या दोनशेहून अधिक पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले. यावेळी त्यांना, त्यांच्या अधिकार आणि कर्तव्यांची योग्य पद्धतीने माहिती करुन देण्यात आली. या क्षेत्रातील नामांकित प्रशिक्षक पंकज मेहता, द्वारका जालन, आनंद मेहता आणि इतरांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

दोन दिवसांच्या या प्रशिक्षणात अमरचंद शर्मा, एन.आर.परमेश्वर, संजीव सूर्यवंशी यांची यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ए.एस.एन मूर्ती, ज्योती नार्वेकर, नयन कवळे, अविनाश गोयल, प्रवीण सरनाईक, खेमंत टेलर यांनी विशेष परिश्रम घेतले. दीप नाईक, प्रियदर्शनी पाटील, विद्या अधिकारी, विजय वनगे यांनी सदर प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी रायगड जिल्ह्यातील अलिबाग, रोहा, नागोठणे, महाड, मांडवा, श्रीबाग, नागाव, पेण; तर नवी मुंबईतील पनवेल, उलवे, सानपाडा, खारघर, कळंबोली, कामोठे, उरण, वाशी, नेरुळ, ऐरोली आणि परिसरातील अनेक लायन्स क्लब सहभागी झाले होते.

जासईच्या शुभम म्हात्रेला सुवर्णपदक

। चिरनेर । वार्ताहर ।

पुणे बालेवाडी क्रीडांगण येथे पार पडलेल्या वाको महाराष्ट्र वरिष्ठ आणि मास्टर अजिंक्यपदाच्या राज्यस्तरीय स्पर्धेत, रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारा, जासई उरण येथील शुभम परशुराम म्हात्रे यांनी किक लाईट - ६९ या प्रकारात क्रिएटिव्ह टीम फार्म या प्रकारात सुवर्णपदक पटकाविले.

त्याची पंजाब येथे होणाऱ्या वाको राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. स्पर्धेत २७ जिल्ह्यातील

२७८ विद्यार्थी स्पर्धक सहभागी झाले होते. जिल्ह्याचे प्रशिक्षक संतोष मोकल व जीवन सर यांचे शुभम म्हात्रे याला या स्पर्धेसाठी मार्गदर्शन लाभले. दरम्यान मराठी सिंगर खंडेराया झाली माझी दैना या सुप्रसिद्ध गाण्याचे सिंगर आणि कंपोसर वैभव लोंढे यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

तर या स्पर्धेला वाको गुजरातचे प्रेसिडेंट सिद्धार्थ सर, वाको महाराष्ट्र प्रेसिडेंट निलेश शेलार, आणि वाको महाराष्ट्र टीमचे सर्व सीनियर उपस्थित होते.

पुलावरील खड्ड्यांची दुरुस्ती

। खारेपाट । वार्ताहर ।

माणकुले फाटा ते बहिरीचापाडा दरम्यान रस्त्याला पडलेल्या खड्ड्यांची अलिबाग तालका काँग्रेसचे सहसचिव महेंद्र म्हात्रे यांच्या स्वखर्चाने दुरुस्ती केली.

गेल्या सहा महिन्यापूर्वी समुद्राच्या खाऱ्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाल्याने व मोठ्या उधानाच्या खाऱ्या पाण्याचा वेगवान लाटांच्या माऱ्यामुळे सदर रस्त्यानजिक असलेला संरक्षण कठाडा तुटल्याने खारे पाणी रस्त्यावर घुसल्याने पडला व रस्त्याला खड्डे पडले होते. डलेले खड्डे पत्रकार महेंद्र म्हात्रे यांच्या प्रयत्नाने नुकतेच सिमेंट काँक्रीट भरुन दुरुस्त करण्यात आले. महत्वाचे म्हणजे सदर खड्यामुळे सर्व प्रकारच्या वाहन चालकांना व नागरिकांना त्रास होऊ नये हेच त्यांचे उद्दीष्ट असल्याचे त्यांनी सागितले.

भरडखोलची वारकरी दिंडी पंढरपूराकडे

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील श्री क्षेत्र भरडखोल येथून रविवार ११ जून रोजी सकाळी ७ च्या सुमारास पायी वारकऱ्यांच्या दिंडी चे पंढरपूर कडे प्रस्थान झाले. ३८ वर्षाची अखंडित परंपर असलेल्या ह्या वारी सुमारे १५० वारकरी सहभागी झाले आहेत. दरवर्षी या गावातून आषाढी एकादशीसाठी शेकडो भक्त पायीवारी दिंडी मध्ये सहभागी होऊन विठुरायाच्या दर्शनासाठी जात असतात. दरवर्षी जेष्ठ महिन्याच्या वद्य अष्टमीच्या दिवशी या वारीचे प्रस्थान भरडखोल येथून होत असते. आज रविवार ११ जून रोजी या वारकरी

दिंडीचे प्रस्थान सकाळी ७ च्या सुमारास झाले. पुढे आठव्या मुक्कामी ही वारी लोणंद या ठिकाणी ज्ञानेश्वर माऊली पालखी मध्ये सहभागी होऊन पुढे पंढरपूरकडे रवाना होईल.

खा. तटकरे यांचा दावा, विविध विकास कामाचे लोकार्पण

आगामी काळात महाविकास आघाडीपुन्हा सत्तेवर येणार

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

विकासकामांच्या माध्यमातून राज्यात आगामी काळात महाविकास आघाडीच पुन्हा सत्तेवर येईल,असा दावा खा.सुनिल तटकरे यांनी केला आहे. भरडखोल येथे सत्कार समारंभ तर वडवली आदर्श सांसद गावातील विविध विकास कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

आदर्श सांसद ग्राम योजनेतून दत्तक घेण्यात आलेले श्रीवर्धन तालुक्यातील वडवली गावातील नागरी सेवा योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण करण्यात येणार आले. यामध्ये श्री गावदेवी मंदिर ते शंकर आळी रस्ता डांबरीकरण, अंगणवाडी सोलर पॅनल व सोलर दिवाबत्ती, वरचा मोहल्ला डांबरीकरण रस्त्याचे, निरंकारी भवन ते पाण्याची टाकी डांबरीकरण रस्त्याचे उद्घाटन, संतोष भायदे ते निरंकारी भवन डांबरीकरण रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले. तसेच भरडखोल येथे कोळी समाजाच्या नौका मालक यांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी महमद मेमन, दर्शन विचारे, सूचिन किर, मंदार तोडणकर, वडवली सरपंच प्रियांका नाक्ती, उपसरपंच सुरेश धुमाळ, किशोर बिराडी, सदानंद खेउर, रिझवान चिविलकर, बबन सुर्वे, ज्योती परकर, सुजित पाटील, संतोष भायदे, विजय पांडव, ल.सु. भाये, मोतीराम परबळकर, भंडारी समाज महिलाध्यक्ष भक्ती मांजरेकर तसेच भरडखोल येथील रामचंद्र वाघे, नामदेव पावशे, कृष्णा चोगले, जीवना पर्सनेट अध्यक्ष मोहन वाघे, हरिभाऊ वाघे, तुकाराम वाघे, लक्ष्मण

भोईनकर, नारायण खोपटकर, गणेश पाटील आणि इतर उपस्थित होते.

यावेळी आपल्या मनोगतामध्ये खासदार सुनील तटकरे म्हणाले की, जीवना बंदर विकासासाठी २०४ कोटी तर भरडखोल बंदर विकासासाठी १३२ कोटी निधी मंजूर केला आहे. यासाठी आदिती तटकरे या विभागाची आमदार व मी स्वतः खासदार म्हणून दिल्ली मध्ये मत्स्यविभागाकडे या कामाचा पाठपुरावा केला आणि याचे श्रेय जर कोणी अन्य घेत असतील तर त्यांनी समोर यावं व तुम्ही कोणाला भेटून यानिधी मंजुरीचा पाठपुरावा केला ते नावासह सांगावं ते खरं निघालं तर मी राजकारणातून निवृत्त होईन असे आव्हान दिले. तर बॅरिस्टर अंतुले यांनी पाहिलेलं स्वप्न म्हणजे सागरी महामार्गाची पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे यासाठी देखील महाविकास आघाडी सरकारने त्याची तरतूद केली आहे. हे सांगताना येत्या काही कालावधीमध्ये आपण सत्तेमध्ये असणार असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला.

सर्वे येथील कार्यकर्ते स्वगृही

सर्वे येथील काही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुस्लिम कार्यकर्ते यांनी नाराज होत बाळासाहेब ठाकरे शिवसेना शिंदे गटा मध्ये प्रवेश केला होता, महमद मेमन सूचिन किर यांच्या मध्यस्थीने गैरसमज दूर होऊन त्या कार्यकर्त्यांनी पुनश्च शिंदे गट शिवसेना पक्षातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला यामध्ये बशीर चोगले, इस्माईल चोगले, तौशिफ चोगले, किफायत चोगले, सिराज चोगले, निसार चोगले, अब्दुल दळवी, शहबाज दळवी, साबीर मुकादम, इस्माईल गंगरेकर, खालिद रईस व इतर यांनी प्रवेश केला. प्रवेशकर्त्यांचे खासदार सुनील तटकरे यांनी पक्षामध्ये स्वागत केले.

सागरी महामार्ग आपल्या भागातून जाणार आहे यासाठी योग्यतो पाठपुरावा करताना महाविकास आघाडीच्या सरकारने १० हजार कोटी रुपयाची तरतूद अर्थसंकल्पामध्ये केली आहे, तर येत्या काळाध्ये आपण सत्तेत येणारच भरडखोल, जीवना बंदरातील जेट्टीसाठी एकूण सुमारे ३३७ कोटी रुपयाचा निधी मंजुरीसाठी आपण पाठपुरावा केला आहे.
– खा. सुनील तटकरे

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)